# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२१

———————————

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

———————————

**भिवंडी (जि.ठाणे) ग्रामीण परिसरातील अनधिकृत बांधकामे नियमित करण्याबाबत**

(१) ५८ (१६-०३-२०२०). **श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी ग्रामीण परिसरातील शेतघरे, आदिवासींची घरकुले, पोल्ट्रीफार्म आणि गोदामे जमिनदोस्त करण्याच्या मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे परिसरातील २० लाख स्थानिकांचा रोजगार धोक्यात आला असल्याने, तो वाचविण्याची मागणी राजकीय पक्षाचे ठाणे ग्रामीण जिल्हा प्रमुख तथा हातमाग महामंडळाचे अध्यक्ष यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक ०८ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.न्यायालयाच्या निर्णयामुळे स्थानिकांच्या रोजगारावर आलेले संकट व त्यामुळे होणारे दुष्परिणाम या परिस्थितीतून योग्य तो मार्ग निघावा व स्थानिकांचा रोजगार वाचवावा, एनए प्लॉटवर असलेली गोदामे, पोल्ट्रीफार्म यांची वाढीव बांधकामे नियमित करण्याबाबत न्यायालयाचा अवमान न होता शासनाने निर्णयात्मक मार्ग काढावा अशी निवेदनाव्दारे विनंती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे ( २६-०२-२०२१) :** (१) व (२) सदरचे निवेदन मा.मुख्यमंत्री कार्यालयास प्राप्त झाले असल्याचे आढळून येत नाही.

(३) यासंदर्भातील निवेदन प्राप्त झाले नसल्याने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

———————————

## हिंगोली जिल्हयातील ७३ हजार शेतकरी अनुदानाच्या प्रतिक्षेत असल्याबाबत

**(२) ९२३ (१४-०४-२०२०). श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यात परतीच्या पावसाने खरीप हंगामातील पिके नष्ट झाली असल्याने प्रशासनाकडून दिनांक ३१ ऑक्टोबर २०१९ रोजी जाहीर केलेली पैसेवारी ७०.५८ टक्के इतकी असल्याचे माहे नोव्हेंबर २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परतीच्या पावसाने ८० टक्के क्षेत्रावरील पिकांची नासाडी झाली असतानाही जास्तीची पैसेवारी काढण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच, हिंगोली जिल्हयातील जवळपास ७३ हजार शेतकरी अनुदानाच्या प्रतिक्षेत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाकडून अतिवृष्टीच्या अनुदानाचे ५२.५१ कोटी येणे थकीत आहे हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विजय वडेट्टीवार (२६-०२-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही. हिंगोली जिल्ह्यात खरीप हंगाम २०१९ मध्ये प्रत्यक्ष पीक कापणी प्रयोगाच्या आधारे दि. ३१ ऑक्टोबर, २०१९ रोजी जिल्ह्याची सुधारित हंगामी पैसेवारी ७०.५८ टक्के इतकी जाहीर करण्यात आली. तथापि, जिल्ह्यात माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१९ च्या सुमारास अवकाळी पावसामूळे झालेल्या नुकसानीमूळे १५ डिसेंबर, २०१९ रोजी खरीप पिकांची अंतिम पैसेवारी ४४.८७ एवढी जाहीर करण्यात आली आहे.

(३), (४) व (५) हिंगोली जिल्ह्यात माहे ऑक्टोबर- नोव्हेंबर, २०१९ अतिवृष्टी अनुदान वाटपासाठी एकूण २२३ कोटी, ७६ लक्ष, ४९ हजार एवढा निधी प्राप्त झाला असून त्यापैकी २२२ कोटी ३९ लक्ष ८० हजार एवढा निधी २,९१,२१३ बाधित शेतकऱ्यांना वाटप करण्यात आलेला आहे. उर्वरित १ कोटी ३६ लक्ष ८८ हजार निधी शासनास समर्पित करण्यात आलेला आहे. याप्रमाणे परतीच्या पावसाने बाधित झालेल्या हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना १००% अनुदानाचे वाटप करण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## हिंगोली शहरात विद्युत खांबावरील तारा धोकादायक स्थितीत असल्याबाबत

**(३) १०८० (१८-०४-२०२०). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली शहरात महावितरण कंपनीकडून बसविण्यात आलेल्या विद्युत खांबावरील तारा लोंबकळलेल्या अवस्थेत असल्याने पानकनेरगाव (ता.सेनगांव) येथील युवकाचा शेतात तुर व कपाशीवर पंपाच्या सहाय्याने फवारणी करत असताना विजेच्या तुटलेल्या तारेला स्पर्श होऊन मृत्यू झाल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच एखादे मोठे वाहन जात असताना देखील महावितरणाला विद्युत पुरवठा बंद करावा लागत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर लोंबकळत असलेल्या विद्युत तारा दुरुस्त करण्याच्या स्थानिकांच्या मागणीकडे दुर्लक्ष करणाऱ्या तसेच युवकाच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भविष्यात असे प्रकार घडू नयेत म्हणून कोणत्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत तसेच मृत व्यक्तीच्या कुटुबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. नितिन राऊत (२४-०६-२०२१) :** (१) मौजे पानकन्हेरगाव (ता.सेनगांव) येथील शिवारात दिनांक २१.११.२०१९ रोजी वादळी वाऱ्यामुळे शेतात तुटून पडलेल्या उपरी तारमार्गातील वीजेच्या तारेच्या संपर्कात येऊन एका युवकास प्राणांतिक विद्युत अपघात घडला आहे.
(२) हे खरे नाही. हिंगोली शहरातील वीज वाहिन्या सुस्थितीत असून जमीनीपासून सुरक्षित अंतरावर आहेत.
(३) महावितरण कंपनीने सदर भागामध्ये वेळोवेळी देखभाल व दुरुस्तीचे कामे केली आहेत. वादळी वाऱ्यांमुळे सदर अपघात घडल्यामुळे महावितरणच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आलेली नाही.
(४) महावितरण कंपनीमार्फत विद्युत पुरवठा करण्यासाठी असलेली विद्युत प्रणाली, विद्युत वाहिन्यांची नियमितपणे देखभाल व दुरुस्ती करण्यात येते. देखभाल दुरुस्तीसाठी एम्पॅनेलमेंटद्वारे एकूण ५ कंत्राटदारांना ३ वर्षाकरिता निविदा देण्यात आल्या आहेत.
दिनांक २६.११.२०१९ रोजी मृत व्यक्तीच्या कुटुंबियांना महावितरण कंपनीच्या नियमानुसार रु.२०,०००/- तातडीची आर्थिक मदत देण्यात आली आहे. तसेच उर्वरित रक्कम रु.३,८०,०००/- दिनांक २६.०५.२०२० अन्वये अदा करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### वीज वितरण कंपनी (जि.सांगली) यांच्याकडे अत्यावश्यक साहित्यांचा अपुरा पुरवठा होत असल्याबाबत

**(४) १३९५ (०३-०४-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वीज वितरण कंपनी (जि.सांगली) यांच्याकडे आवश्यक साहित्य नसणे, ट्रान्सफार्मर, केबल, पोल, व इतर अत्यावश्यक साहित्यांचा अपुरा पुरवठा असल्याने शेतकरी व ग्राहकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास,चौकशीच्या अनुषंगाने वीज वितरण कंपनीला आवश्यक त्या साहित्याचा पुरवठा करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२४-०६-२०२१) :** (१) व (२) सन २०१९-२० मध्ये सांगली जिल्हयामध्ये ५ ते २९ ऑगस्ट या कालावधीत अतिवृष्टी व महापूरामुळे तसेच, नोव्हेंबर अखेर पर्यंत झालेल्या अवकाळी पावसामुळे पोल ट्रान्सफार्मर, वीज वाहिन्या यांची पडझड झाल्याने सुमारे १५० गावातील १६ उपकेंद्रे, २,८५२ रोहित्रे बाधीत झाली व १, ५४, ६५१ बिगरशेती व शेतीपंप ग्राहकांचा वीज पुरवठा

बाधीत झाला. तसेच या महापूरामुळे पोल, ट्रान्सफार्मर, कंडक्टर इत्यादिचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. या आपत्तीमुळे अचानक साहित्याच्या मागणीमध्ये वाढ झाल्याने माहे सष्टेंबर व नोव्हेंबर दरम्यान साहित्याचा तात्पुरता तुटवडा भासला.
(३) आवश्यकतेनुसार साहित्याचा पुरवठा करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

———————————

**हिंगणा येथे ठेकदारामार्फत इलेक्ट्रिक पोलवर काम करत असताना एका व्यक्तीचा झालेला मृत्यु**

**(५) १९१८ (०९-०४-२०२०). श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणा येथे ठेकदारामार्फत इलेक्ट्रिक पोलवर काम करत असताना श्री. बळरामजी ढबाले यांचा दिनांक २४ सप्टेंबर, २०१९ रोजी मृत्यु झाल्याने त्याच्या पत्नी श्रीमती. छाया बळीराम ढबाले, यांनी माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान आर्थिक सहाय्य मिळण्याबाबत अधिक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कं., नागपूर ग्रामीण मंडळ यांच्याकडे लेख पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी मृतकाचे कुटुंबियांना आर्थिक मदत मिळण्याबाबत अधिक्षक अभियंता यांनी आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मृत कुटुंबियांना अद्याप आर्थिक मदत न मिळण्याची कारणे काय आहेत, तसेच आर्थिक मदत तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२४-०६-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हिंगणा उपविभागामार्फत मृताच्या कुटुंबियांना आर्थिक सहाय्यक मदत रक्कम रु.२०,०००/-, दिनांक २४.०९.२०१९ ला देण्यात आले व अंतिम आर्थिक सहाय्य निधी रु.३,८०,०००/- असे एकूण रु.४,००,०००/-दिनांक १८.०२.२०२० ला अदा करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

———————————

**चिखली (जि. बुलढाणा) शहरातील निवासी इमारतीवरून गेलेल्या धोकादायक विद्युत वाहिन्यांबाबत**

**(६) २३९२ (०२-०४-२०२०). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयातील चिखली हे तालुक्याचे मुख्यालय असून तेथील निवासी इमारतीवारून ११ के.व्ही च्या विद्युत वाहिन्या गेल्यामुळे आतापर्यंत बऱ्याच लोकांना जीव गमवावा लागला तर अनेक जण गंभीर जखमी झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास चिखली शहरातील निवासी इमारती वरून गेलेल्या ११ के.व्हीच्या विद्युत वाहिन्या काढण्यात याव्यात अशी मागणी स्थानिक लोक प्रतिनिधींनी दिनाक २१ डिसेंबर २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी स्वरुपात केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२४-०६-२०२१) :** (१) हे खरे नाही. तथापि, चिखली शहरामध्ये ११ के.व्ही.वाहिनीच्या संपर्कात आल्यामुळे मागील ५ वर्षात २ जणांना अप्राणांतिक अपघात झाल्याचे निदर्शनास आले आहे. सदर अपघात पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या वितरण वाहिनीपासून सुरक्षित लंबातरे/समानांतरे न सोडल्यामुळे घडलेले आहेत.
(२) यासंदर्भातील निवेदन मंडळ कार्यालय, महावितरण, बुलढाणा यांचेकडे दिनांक ३१.०१.२०२० रोजी प्राप्त झाले आहे.
(३) ११ के.व्ही. चिखली शहर वाहिनी ही गोरक्षणवाडी, इंदिरा नगर यासारख्या दाट लोकवस्तीतून जात असल्याने सुरक्षिततेच्या हेतूने पर्यायी मार्ग म्हणून नवीन लिंक लाईन (१ किमी लांबीची) प्रस्तावित करण्यात आली असून या लाईनचे ५ पोलचे काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित काम प्रगतीपथावर आहे.

तसेच अंगुरमळा, सुभाष नगर (पंचायत समिती मागे) या भागातील दाट लोकवस्तीतून जाणारी ११ के.व्ही केळवद टाउन वाहिनी सुध्दा पर्यायी मार्गाने टाकण्याचे कामास सुरुवात करण्यात आली होती. मात्र नगर परिषद, चिखली यांनी सुचविलेल्या पर्यायी मार्गाने विद्युत वाहिनी उभारण्यास स्थानिक लोकांनी विरोध दर्शविल्याने सद्यस्थितीत ११ के.व्ही.केळवद टाऊन वाहिनीचे काम प्रलंबित आहे.सदर विद्युत वाहिनी उभारण्यासंदर्भात मुख्याधिकारी, नगरपरिषद चिखली यांचेंशी महावितरणमार्फत समन्वय साधण्यात आला आहे. नवीन ११ के.व्ही. विद्युत वाहिनी उभारणीकरिता नगरपरिषद, चिखली यांचेद्वारा पर्यायी जागा उपलब्ध करुन दिल्यास व स्थानिक स्तरावरील अडथळे दूर झाल्यास ११ के.व्ही केळवद टाऊन वाहिनी हटविण्याचे काम त्वरीत पूर्ण करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

------------

### उल्हासनगर (जि.ठाणे) शहरामधील अनधिकृत इमारती नियमाधिन करण्याबाबत

**(७) २४०९ (०६-०४-२०२०). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) मध्ये अनधिकृत इमारती नियमाधिन करण्यासाठी शासनाने सन २००६ मध्ये कायदा केला होता या कायद्यामध्ये त्रुटी असल्यामुळे याचा फायदा घेता आला नाही त्यामुळे सदर कायद्यामधील त्रुटी कमी करून तसेच यातील रेडी रेकनरचा दर कमी करावा अशा मागणीचे निवेदन लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १६ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनात ज्या वर्षी इमारत बांधली आहे त्या वर्षीच्या रेडी रेकनर नुसार प्रशमन फी आकारावी, सदर बांधकामे ही सन २००५ पूर्वीची न घेता ती दिनांक १ जानेवारी, २०१५ पर्यंतची घ्यावीत, ऑनलाईनची प्रकिया ही एका वर्षापर्यंत वाढवावी इत्यादी मागण्याही केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उल्हासनगर शहरातील अनधिकृत इमारती अधिकृत करण्याबाबात शासनाने निर्णय घेण्यात आल्यानंतरही शहरातील ४० इमारतींचे बांधकाम तोडण्याचा निर्णय उल्हासनगर महापालिका आयुक्तांनी घेऊन उक्त ४० इमारतीतील रहिवाश्यांना इमारत अधिकृत करण्याबाबतचा प्रस्ताव सादर न केल्यामुळे इमारती रिकाम्या करण्याच्या नोटीसा माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उल्हासनगर शहरातील अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी उल्हासनगर पालिका आयुक्तांनी सुरु केलेली ऑनलाईन वेबसाईटवरील सॉफ्टवेअर गेल्या कांही दिवसापासून बंद असल्यामुळे ऑनलाईन अर्ज भारण्याचे काम पुर्णतः ठप्प झाल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०६-२०२१) :** (१) होय.
(२) होय.
(३) हे अशंत: खरे आहे.

४० इमारतीतील रहिवाश्यांनी इमारत अधिकृत करण्याबाबतचा प्रस्ताव सादर न केल्यामुळे इमारती रिकाम्या करण्याच्या नोटीसा प्रभाग समिती १ ते ४ मध्ये प्रत्येकी १० नोटीस असे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये बजावण्यात आलेल्या आहेत.
(४) माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवडयात नेटवर्क मधील अडचणींमुळे ऑनलाईन सॉफ्टवेअर बंद पडले होते. परंतू त्यानंतरच्या आठवडयात वरील ऑनलाईन सॉफ्टवेअर पुर्ण क्षमतेने चालू झाले होते.
(५) शहरातील अनधिकृत बांधकामे नियमित करणेची कार्यवाही महानगरपालिकेतर्फे सुरु आहे. शहरातील अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील ८५५ इमारतींना नोटीस काढून ऑनलाईन प्रक्रियेमध्ये भाग घेण्याचे आवाहन करण्यात आले
होते. परंतू, काही इमारत धारकांनी ऑनलाईन प्रक्रियेमध्ये भाग न घेतल्यामुळे त्यापैकी ४० इमारतींना प्रभाग समिती क्र.१ ते ४ मध्ये इमारत खाली करण्याच्या प्रत्येकी १० नोटीसा महानगरपालिकेकडून बजाविण्यात आल्या होत्या. त्यांनतर ४० इमारतीपैकी काही इमारतींच्या धारकांनी ऑनलाईन प्रक्रियेमध्ये भाग घेतला आहे. तसेच प्रशमन फी बाबत शासनाने दिनांक ०९ सप्टेंबर, २०१९ रोजी उल्हासनगर शहरातील विकासकामे नियमाधिन करणे अधिनियम-२००६ मधील तरतूदीनुसार ज्या दिवशी अनधिकृत विकासकाम नियमानुकुल होईल, त्या वर्षाच्या बाजारदर मुल्य तक्त्यानुसार प्रशमन शुल्क आकारण्याबाबत तसेच दि.०१/०१/२०११ पर्यंतची बांधकामे नियमानुकुल करण्याची महानगरपालिकेची विनंती नामंजूर करण्याचा निर्णय घेतला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

———————————

## पिंपरी-पुणे मेट्रोमार्फत वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट पूर्ण करणेबाबत

**(८) २८५७ (२१-०३-२०२०). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे व पिंपरी-चिंचवड शहरात सुरू असलेल्या मेट्रोच्या प्रकल्पासाठी तोडण्यात आलेल्या झाडांच्या बदल्यात मागील वर्षी सुमारे पाच हजार झाडांची लागवड करण्याचे लक्ष उद्यान विभागाकडून मेट्रोला देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वृक्ष लागवड करण्यासाठी दिलेली मुदत संपून गेली तरीही अद्यापही वृक्षलागवडीचे लक्ष मेट्रो प्रशासनाला पूर्ण करता आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पर्यावरणाचा समतोल राखण्याकरिता मेट्रो प्रकल्पासाठी शहरातील तोडण्यात आलेल्या झाडांच्या बदल्यात वृक्ष लागवड करण्यास मेट्रो प्रशासनाला अपयश आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीत सुमारे पाच हजार वृक्ष लागवडीचे लक्ष पूर्ण करण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०६-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) हे खरे नाही.

महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड, पुणे यांनी पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत ९४७० व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत एकूण ५१७५वृक्षांची लागवड केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही

———————————

## मुंबई महानगर प्रदेशाची (एमएमआर) हद्द वाढवविण्याबाबतचा प्रस्ताव

**(९) २८६७ (२१-०३-२०२०). श्री.महेंद्र दळवी (अलिबाग) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेशाची (एमएमआर) हद्द वाढवविण्याबाबतच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त हद्द वाढ पालघर ते अलिबाग पर्यत करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अलिबागमधील कोणकोणत्या भागाचा समावेश करण्यात येणार आहे व त्याचे स्वरुप काय आहे,

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०६-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) प्रस्तूत हद्दवाढ करण्यापूर्वी रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुका भागश: महानगर प्रदेशामध्ये समाविष्ट होता. हद्दवाढ मंजूर करताना अलिबाग तालुक्याचा उर्वरीत भागाचाही समावेश महानगर प्रदेशामध्ये करण्यात आला आहे.

———————————

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे (एमएमआरडीए) शिवडी-वरळी या ४.५ किमीच्या उन्नत मार्गाकरिता करण्यात येणारी वृक्षतोड

**(१०) ३०३७ (०५-०४-२०२०). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे (एमएमआरडीए) शिवडी-वरळी या ४.५ कि.मी. च्या उन्नत मार्गाकरिता किती वृक्षतोड करण्यात येणार असल्याचा प्रश्न तेथील नागरिकांनी माहे जानेवारी, २०२० च्या मध्ये वा त्या दरम्यान जनसुनावणीच्या वेळी उपस्थित केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मेट्रोच्या कारशेडकरीताही आरे कॉलनीत वृक्षतोड करण्यात आली असतांना आता कोस्टल रोडकरीता होणारी वृक्षतोड कोणत्या कायद्यांतर्गत करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०६-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) कोस्टल रोड प्रकल्पाअंतर्गत वृक्षांची कापणी/पुनर्रोपित करणेबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे प्राप्त होणा-या प्रस्तावासंदर्भात महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ मधील तरतूदीनुसार वृक्ष प्राधिकरणामार्फत परवानगी देणेबाबतची कार्यवाही करण्यात येते.

———————————

## भामा - आसखेड जलवाहिनी व जॅकवेल चे काम संथ गतीने सुरू असल्याबाबत

**(११) ३२७८ (११-०४-२०२०). श्रीमती मुक्ता टिळक (कसबापेठ) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भामा - आसखेड जलवाहिनीचे व जॅकवेलचे काम संथ गतीने होत असल्यामुळे भामा आसखेड प्रकल्पग्रस्तानी सदरचे काम बंद केल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०७-२०२१) :** (१), (२) व (३)
· भामा आसखेड धरण प्रकल्पग्रस्तांनी त्यांच्या शासनाकडील पुनर्वसनाच्या विविध मागण्यांकरिता पुणे महानगरपालिकेच्या भामा आसखेड पाणी पुरवठा प्रकल्पाचे काम सन २०१५ पासून वेळोवेळी आंदोलने करून बंद पाडले होते.
· मात्र, तद्नंतर पुणे महानगरपालिकेने भामा आसखेड प्रकल्पातील जलवाहिनीचे काम पोलीस बंदोबस्तात पूर्ण केले आहे.
· सद्यस्थितीत जॅकवेल व जलवाहिनीसह प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यात आले असून दिनांक १ जानेवारी, २०२१ पासून प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे.

———————————

**मालेगाव (जि.वाशिम) तालुक्यात वेळेवर वीजबिल मिळत नसल्याने ग्राहकांना आर्थिक भुर्दंड पडत असल्याबाबत**

(१२) ३४३६ (२८-०७-२०२०). **श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) मालेगाव तालुक्यातील (जि.वाशिम) येथील अनेक वीज ग्राहकांना तारीख निघून गेल्यानंतर तसेच काही ग्राहकांना वीज देयके मिळतच नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे विज ग्राहकांकडून विज देयके भरण्यास विलंब होत असल्याने ग्राहकांकडून अतिरिक्त दंड वीज वितरण कंपनीकडून वसूल केला जात असल्याने वीज ग्राहकांना आर्थिक भूर्दंड पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन वीज देयक वाटप करणा-या कंत्राटदार व दोषी अधिकारी व कर्मचा-यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. नितिन राऊत (२४-०६-२०२१) :** (१) व (२) मालेगांव उपविभागीय कार्यालयास वीज बिल मिळत नसल्याबाबतची ग्राहकांची तक्रार प्राप्त झालेली नाही. तथापि माहे जानेवारी, २०२० च्या दरम्यान वीज बिल मिळत नसल्याने ग्राहकांना विनाकारण भुर्दड या मथळयाखाली दैनिक पुण्यनगरी व सकाळ या वृत्तपत्रामध्ये बातमी प्रकाशित झालेली होती. त्याबाबत शहानिशा केली असता मालेगाव शहर व ग्रामीण भागात एकूण २९८ वीज ग्राहकांना तप्तर देय तारखेच्या १ ते २ दिवस उशीराने, मात्र देय तारखेच्या आत वीज देयक वाटप झाले असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे सदर ग्राहकाना तत्पर देय सूट मिळाली नाही.

परिणामी सदर ग्राहकांना एकूण रु.१७६०/- एवढी रक्कम माहे फेब्रुवारी, २०२० च्या देयकातून तत्पर देय सूट देण्यात आलेली आहे.
(३) संबंधित कंत्राटदारास निविदेमधील अटी व शर्तीनुसार रु.१८६०/-एवढया रकमेचा दंड आकारण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर महानगरपालिकेस (जि.ठाणे) जागेचा मालकी हक्क मिळण्याबाबत**

(१३) ३५३५ (०५-०४-२०२०). **श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्च न्यायालयाचा आदेश आणि राज्य शासनाच्या निदर्शानुसार उल्हासनगर मधील अनधिकृत बांधकामे नियमित करण्याची प्रक्रिया सूरु आहे परंतु उल्हासनगर महानगरपालिकेची इमारत ही ताबा पावतीवर उभी असून जागेचा मालकी हक्क नसल्याचे दिनांक २२ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उल्हासनगर महानगरपालिका ही शासनाच्या भूखंडावर असून ब्लॉक बर्राकीमध्ये राहणाऱ्या निर्वासीत बांधवाना त्यांचा मालकी हक्क किंबहुना सनद देण्यात आल्याने याच वस्तू अधिकृत आहेत परंतु महानगरपालिका इमारत व अनेक भूखंड व कार्यालय आदिंना मालकी हक्क मिळाला नसल्याने या वस्तू अद्यापही शासनाच्या मालकीचे असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने मागच्या वर्षी चार भूखंडाचा मालकी हक्क दिला असून महानगरपालिका तसेच इतर भूखंड यांचा मालकी हक्क मिळावा म्हणून वारंवार मागणी करूनही दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महानगरपालिकेस मालकीहक्क मिळविण्याबाबत शासनाच्या वतीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०३-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) सन २०१८ मध्ये ४ भुखंडाचा मालकी हक्क महानगरपालिकेस प्राप्त झाला असून दिनांक ३१ जानेवारी, २०२० रोजी उल्हासनगर महानगरपालिका इमारत व गोल मैदान अशा दोन भुखंडाचा मालकी हक्क महानगरपालिकेस प्राप्त झाला आहे. सद्यस्थितीत एकूण ६ आरक्षित जागांची सनद उल्हासनगर महानगरपालिकेस प्राप्त झाली असून उर्वरित सर्व आरक्षित जागा/ भुखंड महापालिकेच्या नावे करुन घेण्याची कार्यवाही महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

———————————

### गोरेगाव (पश्चिम) येथील मुंबई महानगरपालिकेच्या सिध्दार्थ रुग्णालयाची झालेली दूरवस्था

**(१४) ३७८१ (०५-०४-२०२०). श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोरेगाव (पश्चिम) येथील मुंबई महानगरपालिकेच्या मालकीचे असलेले सिध्दार्थ रूग्णालयाच्या इमारतीची दुरवस्था झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णांना पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देण्याबाबत महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, सिध्दार्थ रुग्णालयाचे बांधकाम नव्याने मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रुग्णालय बांधकामाचा विकास आराखडा तयार झाला आहे काय व सदर काम केंव्हा सुरू होऊन पूर्णत्वास कधी जाणार याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०३-२०२१) :** (१) गोरेगाव (पश्चिम) येथील बहन्मुंबई महानगरपालिकेच्या सिध्दार्थ रुग्णालयात मोठ्या स्वरुपातील संरचनात्मक दुरुस्त्यांची आवश्यकता असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये करण्यात आलेल्या संरचनात्मक परिक्षणामध्ये आढळून आले आहे.
(२) सिध्दार्थ रुग्णालयातील विविध विभागांची पर्यायी व्यवस्था खालीलप्रमाणे करण्यात आली आहे:-
· वैद्यकीय बाह्यरुग्ण विभाग गार्डन इस्टेट, लक्ष्मीनगर, गोरेगाव पश्चिम
· रक्तपेढी व डायलेसिस सेंटर महिन्द्रा गार्डन समाज कल्याण केंद्र, व्हिलेज पहाडी, गोरेगाव पश्चिम
· अतिदक्षता विभाग व ए.आर.टी. केंद्र (एच.आय.व्ही. बाधीत रुग्णांसाठी) - हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महानगरपालिका ट्रॉमा केअर रुग्णालय, जोगेश्वरी पूर्व
· शल्यचिकित्सा विभाग, अस्थिव्यंग विभाग, कान-नाक-घसा विभाग, नेत्रचिकित्सा विभाग, स्त्रिरोग

चिकित्सा विभाग, आपत्कालिन वैद्यकीय सेवा विभाग - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय, कांदिवली पश्चिम

· वैद्यकीय चिकित्सा विभाग, बालरोग चिकित्सा विभाग मनोविकार चिकित्सा विभाग, त्वचारोग चिकित्सा विभाग, दंतचिकित्सा विभाग - श्री. हरीलाल भगवती (एन.टी.सी.) महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय, बोरीवली पश्चिम

(३) हे खरे आहे.

(४) बहन्मुंबई महानगरपालिकेच्या तालिकेवरील सल्लागार / महापालिका वास्तुशास्त्रज्ञ यांनी तयार केलेला आराखडा म्हाडा प्राधिकरणाकडे मान्यतेकरीता सादर करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

———————————

## चाकूर (जि.लातूर) तालुक्यातील महावितरणाची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(१५) ५०४७ (०९-०४-२०२०). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकूर (जि.लातूर) तालुक्यातील महावितरणच्या प्रलंबित कामांच्या बाबतीत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास चाकूर तहसिल कार्यालयात महावितरणच्या अधिकारी यांच्या समवेत बैठक आयोजित केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चाकूर तालुक्यात वितरण विभागाची कोणकोणती कामे प्रलंबित होती व त्यानुसार आतापर्यंत कोणकोणती कामे पूर्ण करण्यात आली आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. नितिन राऊत (२४-०६-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर बैठकीत चाकूर तालुक्यातील महावितरणबाबतच्या एकूण २७ तक्रारी/प्रलंबित कामांचा आढावा घेण्यात आलेला होता. यापैकी १२ कामे महावितरण कंपनीमार्फत पूर्ण करण्यात आली आहेत. उर्वरित १५ कामांपैकी १२ कामांचे रोहित्र दुरुस्ती प्रस्ताव तयार करुन मेंटेनन्स एजन्सीना कार्यादेश देण्यात आले आहेत. उरलेल्या चार कामांपैकी ३ कामे ग्राम पंचायत कार्यालयाकडून प्रलंबित आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

———————————

## हिंगोली जिल्हयात ३३ के.व्ही., १३२ के.व्ही. सब स्टेशन प्रस्तावास मंजुरी मिळण्याबाबत

**(१६) ५१९२ (०३-०४-२०२०). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयात ३३ के.व्ही., १३२ के.व्ही. सब स्टेशन मंजुरीसाठी प्रस्तावित असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव मंजुर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**डॉ. नितिन राऊत (२४-०६-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हिंगोली मंडळाअंतर्गत ३३/११ के.व्ही.ची एकूण ५ उपकेंद्र प्रस्तावित करण्यात आली होती. त्यापैकी मौजे आरळ, ता.वसमत व मौजे कानडखेडा, ता.हिंगोली येथे नवीन ३३/११ के.व्ही उपकेंद्र आणि मौजे सांडस, ता.कळमनुरी येथे १X५ एम.व्ही.ए.क्षमतेचे अतिरिक्त रोहित्र व ३ उपकेंद्रात (३३/११ के.व्ही. कुरुंदा, सरतेफळ, मालवटा) कॅपॅसिटर बँक बसविण्याचा प्रस्ताव मंजूर झाला असून सप्टेंबर, २०१९ मध्ये सदरील कामांचा कार्यादेश देण्यात आला आहे. सदरील कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच पैनगंगा बॅरेजेसवर कृषीपंपाना वीज पुरवठा करण्यासाठी मौजे भगवती, ता.सेनगाव आणि मौजे खेर्डा, ता. हिंगोली असून एकूण दोन ३३/११ के.व्ही उपकेंद्रांच्या प्रस्तावाची तांत्रिक बाबींची पडताळणी करण्यात येत आहे.

तसेच २२० के.व्ही. कुरुंदा उपकेंद्राचे काम सुरु असून १३२ के.व्ही. बाराशीव (हनुमान नगर/औंधा) उपकेंद्र उभारणीसाठी मौ.टाकळगव्हाण, ता.औंढा (ना) येथील शासकीय गायरान जमिनीची निवड करण्यात आली असून भू-संपादनाची प्रक्रिया महापारेषण कंपनीमार्फत सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात चारा छावण्यात झालेला गैरव्यवहार

**(१७) ५२२० (१४-०४-२०२०). श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), ॲड.शहाजीबापू पाटील (सांगोले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या दुष्काळग्रस्त भागात चारा छावण्या वाटपात आणि त्या चालवण्यामध्ये सन २०१९ मध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाली असून सुमारे २०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०२०, मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात विशेषत: अहमदनगर, बीड आणि सोलापूर या जिल्ह्यांमध्ये चारा छावण्या वाटपात सर्वाधिक अनियमितता आढळून आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास या चारा छावण्यांची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधित दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विजय वडेट्टीवार (०५-०३-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही. खरीप हंगाम २०१८ मधील दुष्काळाच्या अनुषंगाने राज्यात सुरू करण्यात आलेल्या चारा छावण्या वाटपात आणि त्या चालवण्यामध्ये अनियमितता आढळून आलेली नाही तसेच गैरव्यवहार झालेला नाही.
(३) बीड व उस्मानाबाद जिल्ह्यातील चारा छावण्यांबाबत शासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने महसुल व वन विभाग, शासन आदेश क्रमांक:- एससीवाय-२०२०/प्र.क्र.१६/म-७, दि. ३० जानेवारी, २०२० अन्वये बीड व उस्मानाबाद जिल्ह्यातील चारा छावण्यांची चौकशी करण्यासाठी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीने जा.क्र.२०२० मशाका/नै.आ./कावि-३३७, दि. ९ मार्च, २०२० अन्वये अहवाल सादर केला आहे. सदर अहवालानुसार चारा छावणी सूरू करण्याच्या प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत तसेच चारा छावणी देयकांचे अनुदान वाटपामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता झाल्याचे दिसून आले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उरण, पनवेल तालुक्यातील (जि.रायगड) शेतक-यांच्या जमिनी खरेदी व्यवहारात विकासकांनी जमीन मालकांची फसवणूक केल्याबाबत

**(१८) ५३९६ (०५-०४-२०२०). श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.महेश बालदी (उरण) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईच्या धर्तीवर उरण-पनवेल या तालुक्यातील २५ किमी क्षेत्रात सिडकोने नैना प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला असुन या प्रकल्पात उरण, पनवेल या दोन तालुक्यातील २७२ गावांचा समावेश असुन प्रकल्पांच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या जमिनी हडप करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, पनवेल तालुक्यातील (जि.रायगड) कोप्रोली गाव व परिसरातील शेतक-यांच्या जमीनी वैभव अग्रवाल (सिध्दी ग्रुप), विलास कोठारी (निलसिध्दी ग्रुप) यांच्यासह अनेक बिल्डर्स व विकासकांनी विकत घेण्यासाठी जमीनीची किंमत ठरवून संबंधित शेतकरी व शेतजमीन मालकांना एम.ओ.यु. करुन इसा-याची रक्कम दिल्याची अनेक प्रकरणे सद्यःस्थितीत व्यवहार पूर्ण न करता मागील काही वर्षापासून अडवून ठेवलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पनवेल तालुक्यातील जमीनधारक व शेतकरी यांनी या प्रकरणी जिल्हाधिकारी, रायगड, पोलीस आयुक्त, नवी मुंबई, प्रांत अधिकारी, पनवेल यांच्याकडे उक्त विकासकांच्या विरोधात वारंवार तक्रारी करुनही त्यांच्यावर कारवाई न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त जमीनी या पनवेल तालुक्यात होऊ घातलेल्या सिडकोच्या नैना प्रकल्प परिक्षेत्रातील शेतक-यांकडून आणि जमीन मालकांकडून विकासकांनी जमीनीची साठेखते करुन शेतक-यांना पूर्ण मोबदला मिळण्यास १८ ते २० महिन्यापेक्षा जास्त कालावधी उलटून गेल्याने त्यांची फसगत होऊ नये यासाठी एम.ओ.यु. करुन इसा-याची टोकन म्हणून दिलेली रक्कम विकासकांनी परत घेऊन सदर एम.ओ.यु. रद्द करुन जमीनी परत करण्यात याव्यात अशीही मागणी शेतकरी व जमीन मालकांनी उक्त तक्रारीत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयात याचिकाही दाखल केलेली असल्याने सिडकोची पुढील कार्यवाहीबाबतची वस्तुस्थिती काय आहे व याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०५-२०२१) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

पनवेल तालुक्यातील कोप्रोली हे गाव व परिसर सिडकोच्या नैना प्रकल्पात समाविष्ट असले तरी खाजगी जमीन खरेदी विक्री व्यवहार ही बाब विकासक आणि जमीन मालक यांचेमध्ये परस्पर होत असतात.

संबंधित जमीनमालक / शेतकरी यांनी विकासकांच्या विरोधात केलेल्या तक्रारी उपविभागीय अधिकारी, पनवेल व तहसिलदार, पनवेल यांचेकडे प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(५) सदर याचिका सिडको कार्यालयास अवगत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

------------

## पालघर जिल्ह्यातील नायगाव, वसई-विरार, नालासोपारा या शहरांना जोडणाऱ्या रस्त्याच्या कामाबाबत

**(१९) ६०८४ (०५-०४-२०२०). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील नायगाव, वसई-विरार, नालासोपारा या शहरांना जोडणाऱ्या रस्त्याच्या कामासाठी अंदाजित रक्कम ११२६.०० कोटी रुपयांच्या जवळ असून सदरहु कामाचा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या प्रस्तावित कामाच्या यादीत समावेश असुन सदरहु रस्त्याच्या कामास प्रत्यक्षात केव्हा सुरूवात होणार आहे व किती कालावधीत सदरहु काम पुर्ण होण्याची शक्यता आहे,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकल्पाच्या कामाची सद्यस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०४-२०२१) :** (१) व (२) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत वसई विरार उप प्रदेशातील नायगाव ते विरार पश्चिमेकडील रेल्वेला समांतर रस्ता विकास करण्याबाबतचा प्रस्ताव सक्षम प्राधिकाऱ्याकडे प्रशासकीय मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे. प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर प्रकल्पाचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई उपनगरातील पोयसर, कांदिवली (प) येथील विद्युत केबल बदलण्याबाबत

**(२०) ६४९९ (१९-०४-२०२०). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील ओम साई गणेश सेवा संघ, ॲन्थोनी रोड, पोयसर, कांदिवली-प. येथील विद्युत केबल बदलण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास मुख्य विभागीय, (नॉर्थ डिव्हजन-एनएम) अदानी इलेक्ट्रीक मुंबई,लि. कांदिवली, यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त लेखी निवेदनानुसार विद्युत नेटवर्कमध्ये सुधारणा करण्यासाठी नविन वीज केबल टाकण्याचे काम सुरु करण्याची कार्यवाही मे. अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई, उत्तर विभाग यांनी सुरु केली आहे त्याची सद्य:स्थिती काय आहे,

(३) तसेच सदरहू काम कधीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे, सदरचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

**डॉ. नितिन राऊत (२४-०६-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) मे. अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई, यांनी लेडी फातिमा रोड, पोईसर, बोरिवली (पश्चिम) येथील विदयुत पुरवठयात सुधारणा करण्यासाठी वीज केबल टाकण्याचे काम डिसेंबर २०२० मध्ये पूर्ण केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## साटेली-भेडशी (ता.दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग) येथील विर्डी लघुपाटबंधारे प्रकल्पाच्या बुडित क्षेत्रातील विस्थापितांबाबत

**(२१) ६८२४ (१९-०४-२०२०). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साटेली-भेडशी (ता.दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग) येथील विर्डी लघुपाटबंधारे प्रकल्पाच्या बुडित क्षेत्रातील विस्थापितांनी ९ वर्षे केलेल्या संघर्षानंतर दिनांक २० मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास भूखंडाचा ताबा देण्यात आला मात्र २ वर्षे होऊनही या विस्थापितांना आवश्यक असलेल्या नागरी सोयी-सुविधा देण्यात आलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत २ वर्षे हे विस्थापित आपल्या मागण्यांसाठी शासनाकडे सतत पाठपुरावा करत असतानाही त्याची कोणत्याही प्रकारची दखल घेण्यात आली नसून, वीज, पाणी, रस्ते , समाज मंदिर व शाळा आदी नागरी सुविधांपासून हे विस्थापित अद्याप वंचित आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री.भिकाजी गवस व अन्य काही विस्थापितांना मिळालेले भूखंड हे घर बांधण्यास उपयुक्त नसल्याने ते भूखंड बदली करुन मिळावेत म्हणून वारंवार पाठपुरावा करुनही त्याची दखल न घेतल्याने दि. २ जानेवारी, २०१९ रोजी पुन्हा संबंधितांनी उपोषण केले त्यावेळीही या उपोषणकर्त्यांना नुसते आश्वासनच दिले असून आजमितीस एक वर्षे होऊनही अद्याप भूखंड बदलून मिळण्याच्या प्रस्तावावर विचार करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सततच्या ९ वर्षाच्या संघर्षानंतरही विर्डी प्रकल्पग्रस्त नागरी सोयी- सुविधांपासून वंचित असल्याच्या कारणास्तव सदरहू प्रकल्पग्रस्त दि. ४ फेब्रुवारी, २०२० रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून विर्डी गावठाणातच आमरण उपोषणास बसणार असल्याबाबतचा लेखी इशारा शासनाला दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशीअंती शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विजय वडेट्टीवार (०२-०३-२०२१) :** (१) व (२) अंशत खरे आहे, विर्डी लघुपाटबंधारे प्रकल्पामुळे बाधित झालेल्या ३२ कुटूंबाना ३३ भूखंडाचे वाटप दिनांक-२०/०४/२०१८ रोजी पुर्ण करण्यात आले आहे. मात्र प्रकल्पाची घळभरणी सद्य:स्थितीत प्रस्तावीत नसल्याने अद्याप प्रकल्पगस्तांना विस्थापीत होण्याबाबत नोटीसा देण्यात आलेल्या नाहीत. प्रकल्पग्रस्तांनी विर्डी गावठाणास लागून २०० मी. इतक्या अंतरावर पुनर्वसन गावठाणाची जागा निश्चित केली आहे. प्रकल्पग्रस्तांना १८ नागरी सुविधा पैकी ०८ सुविधा मुळ विर्डी गावात उपलब्ध असल्याने त्याच्या मागणीनुसार त्यापैकी १० नागरी सुविधा पुरविण्यात येणार असून त्यांची कामे प्रगती पथावर आहेत.

(३) अशंत खरे आहे. १.श्रीम.प्रभावती सोमा गवस (वाटप केलेला भूखंड क्र.२९) २. श्री.दत्ताराम सोमा गवस (वाटप केलेला भूखंड क्र. ३६) ३. श्री.पांडुरंग सातु गवस (वाटप केलेला भूखंड क्र. २८) या तीन प्रकल्पग्रस्तांनी भूखंड बदलून मिळण्याची मागणी केली आहे. या तिघांचे मंजूर भूखड क्षेत्र-३.७० चौ.मी. असून त्यांनी मागणी केलेले भूखंडाचे क्षेत्र- ५.५५ चौ.मी. आहे. यामुळे मागणी केलेल्या भूखंड क्षेत्र फोडून आराखडा रेखांकनात बदल करावा लागतो. मंजूर रेखांकन दुरूस्ती करून मिळणेकामी नगररचनाकार, सिंधुदुर्ग यांना कळविण्यात आलेले असून, रेखांकन दुरूस्ती करून दिलेले भूखंड बदलून देणेची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) होय.

(५) प्रकल्पग्रस्तांना देय १० नागरी सुविधा पुरविण्याकरीता आवश्यक कामांच्या निविदा निश्चित झाल्या असून ठेकेदारांनी कामास सुरूवात केली आहे. मात्र कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे झालेल्या लॉकडाउनच्या काळात कामे बंद ठेवावी लागल्यामुळे तसेच सिंधुदुर्ग जिल्हयात वाळू लिलाव प्रक्रीया न झाल्याने ज्या कामांना वाळू आवश्यक आहे. त्या कामांची प्रगती राखता आलेली नाही. मात्र सदर सर्व नागरी सुविधांची कामे लवकरात लवकर करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

———————————

**वैजापूर (जि.औरगांबाद) येथील शासकीय आदिवासी आश्रम शाळेतील मुलींच्या वस्तीगृहाबाबत.**

**(२२) ९९८० (१६-०६-२०२०). श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा मतदार संघ आदिवासी बहुल भाग असून त्या अंतर्गत असलेल्या वैजापूर (जि.औरगांबाद) येथील शासकीय आदिवासी आश्रम शाळा फक्त मुलीं करितां असून सदर शाळेचे बांधकाम साधारणत: ३० ते ४० वर्षे जुने आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आश्रम शाळेत चालू वर्षात एकूण ५५० मुली शिक्षणाकरिता राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात केंद्रीय सहाय्य २७५ (१) या योजनेअंतर्गत सदर आश्रम शाळेतील मुलींकरिता (G+१ वसतीगृह इमारतीचे बांधकाम सुरु झाले असुन इमारतीची (G+१) क्षमता फक्त ४८ खोल्यांची आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नवीन इमारतीचा दुसरा व तिसरा मजला तसेच आणखी एक इमारतीचे (G+३) बांधकाम करणे आवश्यक असल्याबाबतचे लेखी निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास मा. आदिवासी विकास मंत्र्याना दिले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. के.सी.पाडवी (२४-०३-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
वैजापूर ही शासकीय आश्रमशाळा जळगांव जिल्ह्यात कार्यरत आहे.
(२) हे खरे आहे.
(३) केंद्रीय सहाय्य २७५ (१) योजनेंतर्गत सदर आश्रमशाळेतील मुलींकरिता ४८ मुलींच्या क्षमतेचे वसतीगृहाचे बांधकाम सुरु आहे.
(४) हे खरे आहे.
(५) वैजापूर, जि.जळगांव येथील शासकीय आश्रमशाळेतील मुलींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सद्यस्थितीत बांधकाम सुरु असलेल्या वसतिगृहास दुसरा व तिसरा मजला बांधकाम करणे तसेच अजून एक नविन इमारत (G+३) बांधण्यासाठी प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून सदर प्रस्तावाची शासन स्तरावर तांत्रिक छाननी करण्यात येत आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार सदर कामास प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

———————————

## राज्यातील नूतनीकरण न झालेल्या बांधकाम कामगारांना मुदतवाढ मिळण्याबाबत

**(२३) १०४६३ (०२-०६-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या माध्यमातुन राज्यात अंदाजे २२ लाख ५० हजार नोंदणीकृत बांधकाम कामगार आहेत, या बांधकाम कामगारांपैकी सुमारे ११ लाख बांधकाम कामगारांचे नूतनीकरण झाले असून कोरोना विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या लॉकडाऊनमुळे इतर बांधकाम कामगार नुतनीकरणापासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील नूतनीकरण न झालेल्या बांधकाम कामगारांना मुदतवाढ मिळण्याबाबत विधानसभा सदस्य, बल्लारपूर यांनी दिनांक २१ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (०७-१२-२०२०) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम १२ अन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामध्ये माहे जानेवारी, २०२० पर्यंत २२.७७ लक्ष एवढया बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली आहे. त्यापैकी कलम १४ अन्वये माहे जानेवारी, २०२० अखेरपर्यंत १३.२० लक्ष नोंदणीकृत बांधकाम कामगार सक्रिय (जिवीत) आहेत.

केंद्र व राज्य शासनाकडून घोषित करण्यात आलेल्या टाळेबंदीच्या कालावधीत कार्यालयीन कामकाज होऊ न शकल्याने नोंदणी झालेली नाही, ही वस्तुस्थिती आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) केंद्र व राज्य शासनाकडून घोषित करण्यात आलेल्या टाळेबंदीच्या कालावधीत कार्यालयीन कामकाज होऊ न शकल्याने नोंदणी कमी झाली, तथापि, सद्य:स्थितीत नोंदणीची / नुतनीकरणाची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हवेली (जि.पुणे) तालुक्यातील पंचायत समितीकडून ग्रामसेवकांच्या नियमबाह्य बदल्या व प्रतिनियुक्त्या केल्या जात असल्याबाबत

**(२४) ११३४० (०८-०९-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली (जि.पुणे) तालुक्यातील पंचायत समितीकडून ग्रामसेवकांच्या नियमबाह्य बदल्या व प्रतिनियुक्त्या केल्या जात असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१७ ते २२ जून २०२० दरम्यानच्या काळात हवेली पंचायत समितीत ग्रामसेवकांच्या नियमबाह्य बदल्या व प्रतिनियुक्त्या केल्या असून समायोजनाने बदली करण्यात आलेल्या ग्रामसेवकांची प्रतिनियुक्ती करुन त्यांना सोयीची ग्रामपंचायत देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामसेवकांच्या नियमबाह्य बदल्या व प्रतिनियुक्त्यांची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यानुसार ग्रामसेवकांच्या नियमबाह्य बदल्या व प्रतिनियुक्त्यां करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (२५-०२-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही

------------

## निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील वीजेच्या संबंधात येणाऱ्या समस्यांबाबत.

**(२५) ११४३३ (१३-०९-२०२०). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील भेंडाळी, करंजगाव, म्हाळसाकोरे इतर गावामध्ये विजेच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टिने विविध उपाययोजना करण्याची व यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे मार्च, २०२० मध्ये शासनाकडे केलेली आहे. हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने विजेच्या संबंधित समस्या सोडविण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. नितिन राऊत (२४-०६-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) मा.पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १८.०१.२०२० व दिनांक २७.०१.२०२० रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत मा. विधानसभा सदस्य, निफाड मतदार संघ यांनी केलेल्या मागणीप्रमाणे रु.२७.१८ कोटी रुपयांचा प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, नाशिक यांना दिनांक २७.०१.२०२० रोजी सादर केला होता. तसेच रु.३०.११ कोटींचा सुधारित प्रस्ताव पुनश्च दिनांक २८.०२.२०२० रोजी सादर करण्यात आला आहे. औरंगपूर (भेंडाळी) उपकेंद्र व करंजगाव उपकेंद्र येथे प्रत्येकी ५ MVA क्षमतेचे अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर उच्चदाब वितरण प्रणाली (HVDS) योजनमध्ये प्रस्तावित असून सदर कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

------------

## राज्यात मुंबईतील वरळी, नवी मुंबई, पुणे,सातारा,रायगड येथील रेशन दुकानदारांकडून धान्याचा मोठ्याप्रमाणात अपहार करण्यात आल्याबाबत

**(२६) ११४६२ (१५-०९-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुंबईतील वरळी, नवी मुंबई, पुणे, सातारा, रायगड अशा विविध ठिकाणावरून दिनांक ३० एप्रिल, २०२० रोजी वा त्या सुमारास रेशन दुकानदारांकडून धान्याचा मोठ्याप्रमाणात अपहार करण्यात आल्याबाबतच्या तक्रारी नियंत्रण शिधावाटप संचालक नागरी पुरवठा यांना प्राप्त झालेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच केंद्र शासनाच्या योजनेनुसार प्रत्येक कुटुंबासाठी नमुद करण्यात आलेल्या कोट्यापेक्षा कमी धान्य देऊन धान्याचा अपहार केल्याच्या अनेक तक्रारी शासनास दिनांक २९ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास संकेत स्थळावर प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार माहे मे, २०२० अखेर पर्यंत शासनास एकूण किती तक्रारी प्राप्त झाल्या आहेत व त्यामध्ये किती शिधावाटप दुकानदारांनी किती किंमतीच्या धान्याचा अपहार केल्याचे आढळून आले आहे,

(४) असल्यास, सदर प्रकरणातील किती दोषी शिधावाटप दुकानदारांचे परवाने रद्द करुन त्यांचेविरुद्ध शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१२-०२-२०२१) :** (१) वरळी, पुणे, सातारा, रायगड येथे अशा तक्रार निदर्शनास आल्या नाहीत. तथापि, मुंबई-ठाणे शिधावाटप कार्यक्षेत्रातील नवी मुंबई येथील शिधावाटप कार्यालय

क्र. ४१-फ वाशी या कार्यालयास काही शिधापत्रिकाधारकांकडून अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१-फ २८७ या दुकानाबाबत तक्रार प्राप्त झाली होती.

(२) दि. २९.५.२०२० रोजी ऑनलाईन सार्वजनिक वितरण प्रणालीवर तुपगांव, ता. खालापूर, जि. रायगड-अलिबाग येथील रास्तभाव धान्य दुकानाबाबत तक्रार प्राप्त झाली आहे.

(३) व (४) जाने. २०२० ते ऑक्टोबर, २०२० या कालावधीत घेण्यात आलेल्या तपासणीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

पुणे विभागात ४० स्वस्त धान्य दुकान परवानाधारकांवर कार्यवाही करण्यात आली असून १९ स्वस्त धान्य दुकानांचे परवाने रद्द करण्यात आले असून ११ परवाने निलंबित, ८ दुकानदारांना दंड व २ स्वस्त धान्य दुकान परवानाधारकांना सक्त ताकीद देण्यात आली आहे.

मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातंर्गत येणाऱ्या नवी मुंबई येथील दुकान क्र. ४१-फ-२८७ या दुकानदाराच्या विरुध्द प्राप्त तक्रारीनुसार तपासणी दरम्यान आढळून आलेल्या दोषांच्या अनुषंगाने दुकानाचे प्राधिकारपत्र रद्द करण्यात आले आहे.

तसेच, दक्षता पथकामार्फत केलेल्या कारवाईत १८ अधिकृत शिधावाटप दुकानदारांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ अन्वये गुन्हे नोंदविण्यात आले असून १९ दुकानांची प्राधिकारपत्रे रद्द करण्यात आली आहेत तसेच २८ दुकानांची प्राधिकारपत्रे निलंबित करण्यात आली आहे. परिमंडळ कार्यालयातंर्गत घेण्यात आलेल्या तपासणी दरम्यान अन्नधान्य गैरव्यवहारप्रकरणी १

दुकानदाराविरुध्द जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अन्वये गुन्हे नोंदविण्यात आला आहे.
रायगड जिल्ह्यात १४ रास्तभाव दुकानदारांची १००% अनामत रक्कम जप्त करण्यात आली असून दंड वसूलीही करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

————————————

**राज्यातील लॉकडाउन शिथिल केलेले असतानाही अनेक गृहनिर्माण संस्थांनी कठोर अटी घातल्याबाबत**

**(२७) ११४७४ (१६-०९-२०२०). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने लॉकडाउन शिथिल करून अनेक निर्बंध हटवले असतानाही मुंबई व पुणेसह महाराष्ट्रातील अनेक गृहनिर्माण संस्थामधील समित्यांनी इमारतीमध्ये येणारे पाहुणे, कामाला येणाऱ्या मोलकरणी व इतरांना मज्जाव करत असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काही गृहनिर्माण संस्थांकडून प्रवेश देण्यासाठी करोना मुक्त असल्याचे प्रमाणपत्र मागण्याची अट घातली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात न घेता गृहनिर्माण संस्थांनी आपले स्वतःचे कठोर नियम लागू केले असल्यामुळे घर भाड्याने देणे व घेणे थांबल्याने नोंदणी कार्यालयात दस्त नोंदणी होत नसल्याचे दिनांक ८ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने संबंधित गृहनिर्माण संस्थावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१०-०३-२०२१) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
मुंबई शहर, मुंबई उपनगर तसेच वसई, जि. पालघर या भागातील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारतीमध्ये घरकाम करणाऱ्या मोलकरणी,
वाहन चालक, दुध पुरवठा व वृत्तपत्र वितरण करणाऱ्या व्यक्तींना प्रवेश देण्याकरिता संस्था अटी घालत असल्याच्या तक्रारी संबंधित निबंधकांकडे प्राप्त झाल्या आहेत.
(३) नाही.
राज्यातील दुय्यम निबंधक कार्यालयात माहे मे, २०२० ते जुलै अखेर ७३,३९३ इतक्या लिव्ह अँण्ड लायसन्स दस्तांची नोंदणी झालेली आहे.
(४) शासनाच्या दि.२६.६.२०२० व दि.२१.९.२०२० रोजीच्या पत्रान्वये तसेच, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयाच्या दि.२९.६.२०२० व दि.२२.९.२०२० रोजीच्या
पत्रान्वये घर कामगार व वाहन चालक यांना गृहनिर्माण संस्थांमध्ये कामकाजासाठी प्रवेश देण्यासंदर्भात सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या

मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे, तसेच या सूचनांच्या विपरित गृहनिर्माण संस्थांनी नियम तयार करु नयेत, ही बाब राज्यातील सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निदर्शनास आणून देणेबाबत सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना निर्देश दिले आहेत. त्यानुसार सर्व संबंधित निबंधकांनी उक्त निर्देशाचे पालन करणेबाबत गृहनिर्माण संस्थांना सुचित केले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

———————————

**जिंतूर (जि.परभणी) शहरातील हुतात्मा चौक परिसरात रस्त्याच्या कडेला असलेल्या विद्युत रोहित्रांना दरवाजे नसल्याबाबत**

**(२८) ११६५० (१३-०९-२०२०). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिंतूर (जि.परभणी) शहरात मोठ्या प्रमाणात नागरिकांची रहदारी असलेल्या हुतात्मा चौक परिसरात रस्त्याच्या कडेला असलेल्या विदयुत रोहित्रांना दरवाजे नसल्याने अपघात होण्याची शक्यता असल्याचे माहे जून २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास , जिंतूर शहरात अन्य ठिकाणीही विदयुत रोहित्रे तसेच विजेचे वाकलेले खांब, जीर्ण झालेल्या विदयुत तारा याबाबत नागरिकानी विदयुत वितरण विभागास तक्रार करुनही विदयुत विभाग याकडे दुर्लक्ष करीत असल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?
**डॉ. नितिन राऊत (२४-०६-२०२१) :** (१) हुतात्मा चौक परिसरात रस्त्याच्या कडेला ३ विद्युत रोहित्रे आहेत. या तीन रोहित्रांपैकी फक्त एका रोहित्राच्या वितरण पेटीचा दरवाजा नादुरुस्त होता. सदर रोहित्राच्या पेटीच्या दरवाजा दुरुस्तीचे काम देखभाल व दुरुस्ती कामाअंतर्गत करुन ते सुस्थितीत करण्यात आले आहे.
(२) व (३) हे खरे नाही. जिंतूर शहरामध्ये अपघात घडू नये म्हणून माहे जून, २०२० मध्ये Preventive Maintenance (प्रतिबंधात्मक देखभाल) अंतर्गत आवश्यक त्या ठिकाणी देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यात आली आहेत. तसेच जिंतूर शहरात काही भागामध्ये जीर्ण झालेल्या तारा, वाकलेले खांब आणि विद्युत रोहित्रांबाबत ग्राहकांकडून आलेल्या तक्रारी व वितरण शाखेच्या निदर्शनास जी कामे आली त्या कामांची प्रत्यक्षस्थळी जाऊन तपासणी करण्यात आली. त्यानुसार देखभाल दुरुस्ती कामाअंतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटदारामार्फत आवश्यक कामे करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

———————————

**नाशिक जिल्हा परिषदेच्या विविध विभागामधील कर्मचारी लाच घेत असल्याबाबत**

**(२९) ११७२७ (०९-०९-२०२०). श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हा परिषदेच्या विविध विभागामध्ये सी.सी.टी.व्ही कॅमेरे कार्यरत असताना देखील तेथील कर्मचारी लाच घेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाच प्रकरणी अटकेत असलेले कनिष्ठ प्रशासन अधिकारी प्रदीप बागुल यांना पदोन्नती देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणात वरिष्ठ अधिकारी कनिष्ठ प्रशासन अधिकारी प्रदीप बागुल यांना पाठीशी घालत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (२५-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे. प्रदिप बागुल, कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांच्यावर लाचलुचपत विभागाकडून कार्यवाही होण्यापूर्वीच त्यांना पदोन्नती देण्यात आली होती.
(३) हे खरे नाही
(४) श्री. प्रदिप बागुल, कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांना सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे. त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावीत करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

———————————

**कोविड-१९ विषाणुच्या पार्श्वभूमीवर टाळेबंदी परिस्थितीत जिल्हा बँकांचे सहकार क्षेत्र मोडकळीस आल्याबाबत**

**(३०) ११८८२ (२०-०९-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या विकासात अत्यंत महत्त्वाचे योगदान ठरलेल्या सहकार क्षेत्राला कोरोनामुळे लॉकडाऊनचा फटका मोठ्या प्रमाणात बसला असून लहान-मोठ्या सहकारी संस्था व बँका यांना मोठी झळ बसली असून राज्य शासनाची महत्त्वाकांक्षी महात्मा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना प्रलंबित राहिल्याची बाब माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास लॉकडाऊन मुळे अनेक व्यवसाय बंद असल्यामुळे बँका पतसंस्था यांनी दिलेल्या कर्जाची वसुली होणार नसल्याने या संस्थांच्या एनपीए मध्ये वाढ होऊन संस्थांचा नफा कमी झाला असल्याने दोन्ही प्रकारच्या संस्थांना भविष्यात लिक्विडिटी ची कमतरता भासणार आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सहकारी संस्थांचे लेखे सहकार कायद्यातील तरतुदीनुसार १५ मे पर्यंत पूर्ण होणे शक्य नसल्याने सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण विहित मुदतीत म्हणजे ३१ ऑगस्टपर्यंत वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक ३० सप्टेंबर पर्यंत घेता येणार नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मा.सहकार मंत्री, राज्य मंत्री व विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था यांच्या स्तरावर अपिलीय व पुर्नरिक्षण अर्जाची सुनावणी घेता न आल्याने अशी प्रकरणे दीर्घकाळ प्रलंबित राहणार असल्याने नवीन सहकारी संस्थांची नोंदणी उपविधी दुरुस्ती इतर कायदेशीर कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कृषी पणन व कृषी प्रक्रिया संस्था हातमाग यंत्रमाग संस्था, सूतगिरण्या व इतर औद्योगिक सहकारी संस्थांच्या उत्पादनात व मालाच्या विक्रीत अडचणी असल्याने अशा संस्थाना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, मध्यम व दीर्घ मुदतीच्या शेती कर्जाची वसुली कमी झाल्यामुळे विविध कार्यकारी सहकारी संस्थांचा व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या शाखेत वाढ झाल्याने अनेक सहकारी संस्थांचे आर्थिक व्यवहार ठप्प झाल्याने कर्मचाऱ्यांचे वेतन देण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार सहकार्य संस्थांना दिलासा देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०९-०३-२०२१) :** (१) होय.

महात्मा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेची अंमलबजावणी मार्च २०२० मध्ये सुरु झाली असताना कोविड-१९ च्या विषाणूच्या प्रादूर्भावामुळे शासनाने आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ अंतर्गत दि.२४.३.२०२० पासून राज्याच्या विविध भागात टाळेबंदी लागू केली. यामुळे उद्योग-धंदे बंद करावे लागले. सदर टाळेबंदीमुळे राज्याचे उत्पन्नाचे स्रोत कमी झाले. राज्याकडे उपलब्ध असलेला निधी सदर विषाणूवरील उपाययोजनेसाठी वळविण्यात आला. त्यामुळे उक्त कर्जमाफी योजनेस पुरेसा निधी उपलब्ध होऊ शकला नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

याविषयी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील अधिनियमात शासन अध्यादेश दिनांक २८.१०.२०२० अन्वये सुधारणा करण्यात आल्या आहेत.

(४) अंशत: खरे आहे.

(५) अंशत: खरे आहे.

(६) अंशत: खरे आहे.

तथापि कोविड-१९ विषाणुच्या पार्श्वभूमीवर टाळेबंदी परिस्थितीत व्यवसाय-उद्योग धंदे बंद राहिले. त्यामुळे कर्ज परतफेडीस मुदतवाढ या कारणास्तव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे आर्थिक व्यवहार ठप्प झाल्याचे तथा कर्मचाऱ्यांचे वेतन देण्यांत अडचणी निर्माण झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(७) चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

कोविड-१९ या पार्श्वभूमीवर लॉकडाऊनचे होणारे दूरगामी परिणाम व त्यावरील उपाययोजनाबाबत शासनाने दिनांक २७.०५.२०२० रोजी नेमलेल्या समितीने शासनास दिनांक १२.०८.२०२० रोजी अहवाल सादर केला आहे. त्याचप्रमाणे नागरी सहकारी पतसंस्था सामोपचार परतफेड योजनेस शासन निर्णय १२.०६.२०२० अन्वये दिनांक ३१.०३.२०२१ पर्यंत पतसंस्थांना मुदतवाढ देण्यात आली आहे. सहकार कायदयातील कलम ६५, ७५, ८१ यामध्ये सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाकरीता बदल करण्यात आलेले आहेत. पतसंस्था व इतर वित्तीय संस्थामधील एन.पी.ए. तरतूदीबाबत दि.०१.१०.२०२० रोजी परिपत्रक निर्गमित केले आहे. त्यामध्ये पतसंस्थांच्या लेखापरीक्षण वर्गवारीचे निकष शिथिल करण्यात आले आहेत.

कोविड-१९ कर्ज हप्तेवाढ (रिशेडयुलमेंट) योजना" याबाबत दिनांक १६.१०.२०२० रोजी परिपत्रक निर्गमित केले आहे व त्यास दिनांक ३१.०३.२०२१ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील अधिनियमात शासन अध्यादेश दिनांक २८.१०.२०२० अन्वये विविध सुधारणा करण्यात आल्या आहेत.

———————————

## राज्यातील बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या उपकराबाबत

**(३१) १२०३२ (१७-०९-२०२०). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ सन २००७ पासून उपकर जमा करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंडळाकडे बांधकाम व्यवसायिक, पीएमआरडीए, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, रेल्वे, विमानतळ, बोगदे, जलसंधारण इत्यादी कडून उपकर जमा करण्यात येत असून, सदरहू उपकर न भरणाऱ्या प्राधिकरण किंवा संस्था बिल्डर यांना दोन टक्के व्याज किंवा तीन महिने कैद अशा शिक्षाचे प्रावधान करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरण, एसटी महामंडळ, रेल्वे, मेट्रो, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पीडब्ल्यूडी, म्हाडा घरकुल योजना यांच्याकडून २०१२ पासून कमी प्रमाणात उपकर भरण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्र राज्यातील मुंबई, ठाणे, नाशिक, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, नवी मुंबई महानगरपालिका कडून तसेच रेल्वे व इतर शासकीय संस्थांकडून इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाकडे सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये संस्थानिहाय उपकर जमा करण्यात आल्याची माहिती उपलब्ध नसल्याचे माहितीच्या अधिकारात माहिती मागवण्यात आली असतांना निदर्शनास आले असून, महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम इमारत मंडळाकडे सन २०२० पर्यंत नऊ हजार कोटी रुपये जमा झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर रक्कम कोणी, किती जमा केली असता कोणत्याही प्रकारची माहिती महामंडळाकडे नसल्याचे दिनांक ५ एप्रिल, २०१३ रोजी प्राप्त झालेल्या माहितीच्या अधिकारात उघड झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, प्रमाणापेक्षा ५० टक्के उपकराची रक्कम कमी जमा झाल्याचे निदर्शनास आले असून, बांधकाम इमारत व इतर बांधकाम कामगार मंडळाकडील जमा झालेल्या उपक्रमातून फक्त पाच टक्के खर्च प्रशासनावर करण्याचा कायदा असतानाही जमा झालेल्या उपकारातून पाच टक्के पेक्षा जास्त रक्कम मनमानीपणे अधिकारी खर्च करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, उक्त संपूर्ण प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने या मंडळाकडे जमा केलेल्या उपकराची सर्वकष चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०७-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर अधिनियम, १९९६ च्या कलम ८ अन्वये विर्निदिष्ट केलेल्या मुदतीत बांधकामाचे मूल्यांकन केलेला उपकर न भरल्यास नियोक्त्याला प्रत्येक महिन्यासाठी २ टक्के दराने व्याज आकारण्याची तसेच कलम १२ (२) अन्वये जास्तीत जास्त ६ महिने तुरुंगवास किंवा दोन्ही अशी तरतूद आहे.
(३) हे खरे नाही.

महावितरण, एसटी महामंडळ, रेल्वे, मेट्रो, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पीडब्ल्यूडी, म्हाडा घरकुल योजना यांनी भरण्यात आलेल्या उपकराची विगतवारी उपलब्ध नसली तरी दिनांक १६ एप्रिल, २००८ च्या अधिसूचनेन्वये उपकर भरणा करण्याकरिता प्राधिकृत केलेल्या यंत्रणेमार्फत उपकर जमा केला जात असून प्रत्येक वर्षी उपकराच्या रकमेत वाढ झालेली आहे.
(४) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे मार्च, २०२० पर्यन्त रुपये ९,१३३ कोटी जमा झाले आहेत.

तसेच मंडळाकडे संस्थानिहाय उपकर जमा झाल्याची विगतवारी उपलब्ध नसली तरी विगतवारी उपलब्ध करुन घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(५) होय, हे खरे आहे.
(६) हे खरे नाही.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे उपकर जमा रकमेत वाढ झालेली आहे.

सन २०१७-१८ पर्यन्त महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे रुपये ७४४३,७०,३९,२३१/- उपकर जमा झाला असून त्यापैकी रुपये ३४६,२२,७१,१४९/- खर्च झालेला असून त्यातून रुपये १३५,३४,६२,२५७/- प्रशासकीय खर्च करण्यात आलेला आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जत (जि.सांगली) तालुक्यात उच्च दाब वितरण प्रणाली (H.V.D.S.) अंतर्गत**
**१३०० विद्युत जोडण्या प्रलंबित असल्याबाबत**

**(३२) १२०५६ (२५-०९-२०२०). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जत (जि.सांगली) तालुक्यात माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान उच्च दाब वितरण प्रणाली (H.V.D.S.) अंतर्गत १३०० विद्युत जोडण्या देणे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उच्च दाब वितरण प्रणाली अंतर्गत विद्युत जोडण्या देणे प्रलंबित असल्यामागाची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विद्युत जोडण्या देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. नितिन राऊत (२४-०६-२०२१) :** (१) जत तालुका, जिल्हा सांगली येथे मार्च,२०१८ अखेर २६६८ कृषीपंप वीज जोडण्या प्रलंबित होत्या. त्यापैकी जुलै, २०२० पर्यंत ९६८ कृषीपंपांना वीज जोडण्या देण्यात आलेल्या आहेत.

(२) उच्चदाब वितरण प्रणाली योजनेअंतर्गत विद्युत जोडण्या देणे प्रलंबित असण्यामागची कारणे खालीलप्रमाणे आहेत :-

(i) नवीन संकल्पना असल्यामुळे लहान क्षमतेचे रोहित्र डिझाईन करुन मंजूरी आणि टाईप चाचणी नव्याने करावी लागली.

(ii) मोठया संख्येने १०/१६/२५ के.व्ही.ए.चे रोहित्र उपलब्ध करणे आवश्यक असल्याने त्याकरिता नवीन सेटअपसह उत्पादक तयार नसल्याचे सुरुवातीला रोहित्रांचा पुरवठा करण्यास विलंब लागला.

(iii) प्रत्येक रोहित्र कार्यान्वित करण्यासाठी विद्यत निरिक्षक यांची परवानगी आवश्यक असल्याने विलंब होत होता. परंतु सदर अट आता शिथिल करण्यात आली आहे.

(iv) मुसळधार पाऊस व शेतात उभी पिके असल्याकारणाने रोहित्र उभारणीत अडथळा निर्माण होत होता.

(v) माहे मार्च, २०२० पासून सुरु असलेला कोरोनाचा प्रादुर्भाव यामुळे काम पूर्ण होण्यास विलंब झाला आहे.

(३) सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यांमध्ये पूर्णत: टर्नकी प्रमाणे काम करणाऱ्या मे.भारत इलेक्ट्रीकल ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स प्रा.लि. (आर-१३) यांना तसेच अंशत: टर्नकीच्या ५ कंत्राटदारांना (एकूण ७ निविदांच्या कामाकरिता) कमामध्ये असमाधानकारक प्रगती असल्यामुळे, कामामध्ये सुधारणा करण्याची नोटिस महावितरणमार्फत बजाविण्यात आलेली आहे. त्यापैकी अंशत: टर्नकीच्या मे.रोहन इलेक्ट्रिकल एंटरप्राइजेस (निविदा क्र. टी-५९, टी-६२ आणि टी-६३) या कंत्राटदाराचे काम कमी करुन दुसऱ्या कंत्राटदाराकडून त्यांचे काम पूर्ण करुन घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**शिरुर-हवेली (जि.पुणे) तालुक्यात वीज वितरण कंपनीच्या वीजवाहक तारा जीर्ण झाल्याबाबत**

**(३३) १२१०६ (१५-०९-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरुर-हवेली (जि.पुणे) तालुक्यात वीज वितरण कंपनीच्या वीजवाहक तारा जीर्ण झाल्या असून ट्रान्सफार्मरवर फ्युज बॉक्सची अनेक ठिकाणी दुरवस्था झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जीर्ण झालेल्या तारांमुळे तसेच लोंबकळत असलेल्या तारा तुटून पिकांचे नुकसान होण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरणाकडून सर्व्हेक्षण करुन जीर्ण तारा बदलण्याबाबत व रोहित्रावरील फ्युज बॉक्स दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. नितिन राऊत (२४-०६-२०२१) :** (१) महावितरण बारामती ग्रामीण मंडळांतर्गत केडगांव विभागातील शिरुर (जि.पुणे) तालुक्यात वीज वितरण कंपनीची काही विद्युत प्रणाली जुन्या कालावधीतील असल्यामुळे त्यामध्ये बिघाड होण्याची शक्यता असते. तथापि, जुन्या झालेल्या वीजवाहक तारा तसेच रोहित्रावरील फ्युज बॉक्सची दुरुस्ती करणे ही कामे महावितरणमार्फत नियमितपणे करण्यात येत आहेत.

(२) शिरुर तालुक्यामध्ये एप्रिल, २०१९ ते मार्च, २०२० या कालावधीत जीर्ण व लोंबकळत असलेल्या तारांमुळे पीक नुकसानीची ०४ अपघात प्रकरणे घडले आहेत.

(३) सन २०१९-२० या आर्थिक वर्षात शिरुर तालुक्यामध्ये ४३ कि.मी.उच्चदाब वाहिनीच्या जीर्ण झालेल्या तारा बदलण्यात आलेल्या आहेत. तसेच एकूण १३० वितरण पेटया व उच्चदाब वाहिनीचे जीर्ण झालेले ४८ पोल व लघुदाब वाहिनीचे १३० पोल बदलण्यात आलेले आहेत. सन २०२०-२१ मध्ये शिरुर तालुक्याअंतर्गत २.५ कि.मी. उच्चदाब वाहिनीच्या तारा बदलण्याचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. तसेच एकूण ३२ रोहित्रांना नवीन फ्युज बॉक्स बसविण्यात आलेले असून ३८४ बॉक्सची ११५४ फ्युज नव्याने बसवून दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यात महावितरण कंपनीच्या बार्शी विभागातील माढा, करमाळा, तसेच पंढरपूर व अकलुज विभागांतील ३३ के.व्ही.ए उपकेंद्रामधुन विदयुत पुरवठा कमी दाबाने मिळत असल्याबाबत

**(३४) १२१९८ (१५-०९-२०२०). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात महावितरण कंपनीच्या बार्शी विभागातील माढा, करमाळा, तसेच पंढरपूर व अकलुज विभागांतील ३३ के.व्ही.ए उपकेंद्रामधुन विदयुत पुरवठा कमी दाबाने मिळत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणकडून ३३ के.व्ही.ए उपकेंद्रातून कृषि पंपाना विदयुतपुरवठा कमी दाबाने होत असल्याने कृषि पंपाच्या मोटारी कमी व्होल्टेजमुळे चालत नसणे, वारंवार रोहित्राच्या फेज व लिंक वायर जळण्याचे प्रमाण वाढलेले असणे तसेच कृषि पंप जळण्याचा घटना वाढत असल्याने शेतकरी संकटात सापडलेला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू विभागातील कमी दाबाने विद्युत पुरवठा होत असलेल्या सबस्टेशनमध्ये अतिरिक्त ट्रान्सफार्मर बसविणे, लोड वाढवून घेणे, याबरोबर आवश्यक उपाययोजना करण्यासाठी महावितरण कंपनीकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत?

**डॉ. नितिन राऊत (२४-०६-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे. सोलापूर जिल्हा हा प्रामुख्याने रब्बी हंगाम जिल्हा आहे. त्यामुळे माहे जानेवारी ते मे दरम्यान वीजेच्या मागणीत प्रचंड वाढ होते. याच दरम्यान उजनी जलाशयातून सोलापूर शहरासाठी भीमा नदीद्वारे पाणी सोडण्यात येते. तसेच उजनी व निरा धरणामधून कॅनालद्वारे पाण्याचे सिंचनासाठी आवर्तन करण्यात येते. या कालावधीत

जिल्ह्याची वीजेची उच्चतम मागणी १२०० ते १२५० एम.डब्ल्यू असते त्यामुळे काही भागातील उपकेंद्रामधून कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा उपकेंद्रातील कॅपॅसिटर बँक चालू करुन योग्य दाबाने वीज पुरवठा करण्यात येतो.

(३) व (४) उजनी व निरा धरणातून सिंचनासाठी पाणी सोडल्यानंतर हूक टाकून अनधिकृत वीजेचा वापर शेतकऱ्यांकडून होतो, ज्यामुळे कमी दाबाच्या वीज पुरवठयाची स्थिती निर्माण होते व रोहित्रांवरील फ्युज वायर जळण्याचे प्रकार घडतात. त्याकरिता या कालावधीत अनधिकृत वीजेच्या मोटारी व हुक कनेक्शन काढण्याची विशेष मोहिम राबविण्यात येते.

तसेच कमी दाबाने विद्युत पुरवठा होत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा उपकेंद्रामध्ये अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर बसविणे अथवा नवीन उपकेंद्राच्या आवश्यकतेबाबत तांत्रिक सुसाध्यतेची पडताळणी करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने सोलापूर जिल्ह्यामध्ये १० उपकेंद्रामध्ये अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे व १० नवीन ३३/११ के.व्ही. उपकेंद्र उभारणी प्रस्तावित करण्यात आलेले आहेत. सदर प्रस्तावामध्ये बार्शी विभागातील माढा, करमाळा तसेच पंढरपूर व अकलुज विभागामध्ये ७ उपकेंद्रामध्ये अतिरिक्त ट्रान्सफार्मर बसविण्याचे व ६ नवीन ३३/११ के.व्ही.उपकेंद्र उभारणीचे काम समाविष्ट आहे. सदर प्रस्तावाची तांत्रिक पडताळणी करण्यात येत असून मंजूरीप्रमाणे व निधीच्या उपलब्धतेनुसार कामे करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आर्वी (जि.वर्धा )येथील कारंजा पंचायत समितीत झालेला गैरव्यवहार**

**(३५) १२२७४ (११-०९-२०२०). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी (जि.वर्धा) येथील कारंजा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री. उमेश नंदागवळी यांनी सकाळ वृत्त पत्राचे प्रतिनीधी श्री. गजानन बाजारे यांनी आपल्या वृत्त पत्रात गट विकास अधिकारी यांचे गैरव्यवहाराचे वृत्त प्रकाशीत केल्यामुळे त्यांचे विरोधात खोटा गुन्हा दाखल केला असून त्यांचे विरोधात कारंजा तालुक्यातील पत्रकारांनी दि. १५ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्राम पंचायत नरसिंगपुर व ग्रा.प. बोटोणा, (ता. कारंजा) येथील तत्कालीन ग्रामसेवक श्री. नरेंद्र गुळघाने यांचेवर गैरव्यवहाराचे आरोप ठेवुन निलंबीत केले व त्यांचे निलंबन काळातील मिळणाऱ्या उदर निर्वाह भत्यामधुन १५ हजार रूपये कपात आहे तसेच टाळंबंदीच्या काळामध्ये कोणतीही सभा घेण्यास बंदी असताना दिनांक १५ मे, २०२० रोजी गट विकास अधिकारी यांनी कारंजा पंचायत समितीमध्ये ग्रामसेवकांची नियमबाह्य आढावा बैठक घेतली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोनाचा प्रादुर्भाव चालु असतांना पंचायत समिती, कारंजा यांना पशु संवर्धन विभागातंर्गत आलेला निधी हा पशु सवर्धन दवाखान्याच्या विकासाकरिता आलेला होता व त्यासाठी सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे गरजेचे असतांनी गट विकास अधिकारी यांनी दि. २७ डिसेंबर,२०१८ ला सर्वसाधारण सभेमध्ये ठराव मंजुर झालेला आहे असे खोटे कार्यवृत्त तयार करून २,४८,०००/- रूपयाचा अपहार केलेला आहे, तसेच ग्रा.प. किन्हाळा, ग्रा.प. सेलगाव लवणे अश्या अनेक ग्रामपंचायत मध्ये ग्रामसेवकावर दबाव टाकुन मर्जीतील कंत्राटदारामार्फत मशिन द्वारे कामे

करून व खोटे मजुरांचे नावाने हजेरी पत्रक भरून ४,३१,३८४/- रूपयाचा अपहार केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गट विकास अधिकारी श्री. उमेश नंदागवळी यांचे विरोधात तक्रारी प्राप्त झाल्यानंतर मुख्य कार्यपालन अधिकारी, जि.प. वर्धा यांनी चौकशी करून व गट विकास अधिकारी हे गैरव्यवहार प्रत्यक्ष सहभागी असल्याचे सिध्द करून कक्ष अधिकारी ग्राम विकास विभाग यांचेकडे दोनदा अहवाल पाठवून अजुन पर्यत त्यांच्यावर कोणतेही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत, नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (३०-०६-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

दैनिक सकाळ या वृत्त पत्राचे प्रतिनिधी श्री.गजानन बाजारे यांचेवर श्री.उमेश नंदागवळी यांनी कोणताही गुन्हा दाखल केलेला नाही.

परंतु वृत्तपत्राचे प्रतिनिधी यांनी दिनांक १५.०६.२०२० रोजी व त्यासुमारास आंदोलन केले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामधील सेवाशुल्काच्या रकमेचा विनियोग कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय दि.११.१०.२०२० व पुरक पत्र दि.३०.०१.२०१३ व दि.२३.१०.२०१८ नुसार पशु दवाखान्याचे आवश्यक बाबीवर करावयाचा होता. तो खर्च करताना पंचायत समिती सभेची मान्यता आवश्यक नव्हती. यामध्ये रूपये २,४८,०००/- चा अपहार झालेला नाही. परंतु दि.२७.१२.२०१८ च्या सभेत ठराव न घेता, ठराव घेतला आहे असे दाखविले आहे. ही बाब खरी आहे.

तसेच ग्रामपंचायत किन्हाळा व सेलगाव लवणे या गावामध्ये पांधन रस्ता या कामामध्ये अपहार झाल्याची बाब सकृतदर्शनी आढळून आल्याने याप्रकरणी पोलीस स्टेशन, कारंजा येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस स्टेशन, कारंजा मार्फत पुढील तपास सुरू आहे.

(४) व (५)

मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.वर्धा यांचेकडून प्राप्त झालेल्या चौकशी अहवालानुसार श्री.यु.एम.नंदागवळी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती,कारंजा, जि.प.वर्धा यांचेकडून वरीलप्रमाणे झालेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने त्यांच्याविरूध्द विभागीय चौकशी करणेबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, नागपूर विभाग यांच्या शिफारशीने शासनास सादर करण्याबाबत तसेच इतर जबाबदार कर्मचाऱ्यांविरूध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या स्तरावरून करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.वर्धा यांना शासनाच्या दि.२१.१२.२०२० च्या पत्रान्वये कळविले आहे.

---

**निमगाव व नारखेड ( ता. नांदुरा, जि बुलढाणा) या विदयुत उपकेंद्रामध्ये**
**सिंगल फेस ची व्यवस्था करण्याबाबत**

**(३६) १२२८२ (१३-०९-२०२०). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निमगाव व नारखेड ( ता. नांदुरा, जि बुलढाणा) या विदयुत उपकेंद्रामध्ये सिंगल फेस ची व्यवस्था नसल्याने शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी विदयुत पुरवठा होत नसल्याचे दिनांक १ जून २०२० रोजी व त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त विदयुत उपकेंद्रातर्गत येणाऱ्या गावांना रात्रीच्या वेळी विदयुत पुरवठा होत नसल्याने शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने विदयुत उपकेंद्रामध्ये सिंगल फेसची व्यवस्था करून सदर उपकेंद्र अंतर्गत येणाऱ्या गावांना रात्रीच्या वेळी विदयुत पुरवठा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२४-०६-२०२१) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही. अकोला परिमंडळातील बुलढाणा मंडळाअंतर्गत मलकापूर विभागातील नांदुरा उपविभागाअंतर्गत ३३/११ के.व्ही. निमगाव व नारखेड या उपकेंद्रामधून एकूण ८ वाहिन्या निघत असून त्यापैकी ३ गावठाण व ५ पूर्णत: कृषी वाहिन्या आहेत. सद्यस्थितीत या दोन्ही उपकेंद्रातून निघणाऱ्या सर्वच कृषीवाहिन्यांवर कोणत्याही प्रकारचे घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक स्वरुपाचे वीज कनेक्शन जोडलेले नसून मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या निर्देशानुसार या वाहिन्यांवर आठवडयातील चार दिवस रात्री १० तास व आठवडयातील तीन दिवस दिवसा ८ तास अशा प्रकारे चक्राकार पध्दतीने वीज पुरवठा उपलब्ध असतो. तसेच गावठाण वाहिन्यांवर २४x७ वीज पुरवठा सुरळीतपणे केला जातो.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

———————————

## परळी वैजनाथ (जि. बीड) येथे स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या नावाने महामंडळ स्थापन करुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३७) १२३९९ (१८-०७-२०२०). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परळी वैजनाथ (जि. बीड) येथे स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या नावाने महामंडळ स्थापन करण्याची घोषणा शासनाने केली असून या महामंडळांतर्गत ऊसतोड कामगारांना कर्ज व विविध योजनेचा लाभ मिळावा याकरिता हे महामंडळ स्थापन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महामंडळातील अध्यक्षांची नियुक्ती होऊन बराच कालावधी होऊन गेल्यानंतरही महामंडळाचे सदस्य नियुक्ती न होणे व एकही कामगारांना योजनेचा लाभ घेता आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे महामंडळास निधीची तरतूद न केल्यामुळे गोरगरीब कष्टकरी ऊसतोड कामगारांना या योजनेचा लाभ घेता येत नसल्यामुळे ऊस तोड कामगार यामध्ये असंतोष निर्माण झाला, हे खर आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने महामंडळाने कार्यालयासंदर्भात नियमावली तयार करुन ऊसतोड कामगारांना कर्ज व विविध योजनेचा लाभ देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०६-०५-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) सदरचा विषय उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या अखत्यारीत होता. आता शासन निर्णय क्र. असंका-११२०/प्र.क्र.२०/काम-७अ, दिनांक २४.०२.२०२० अन्वये या विभागास हस्तांतरीत करण्यात आलेला आहे. गोपीनाथ मुंडे उसतोड कामगार महामंडळाच्या अनुषंगाने आढावा बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे दि.२९.०९.२०२० रोजी घेण्यात आलेली आहे. सदर बैठकीमध्ये गोपीनाथ मुंडे उसतोड कामगार महामंडळ व उसतोड कामगारांसाठी विविध निर्णय घेण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही

———————————

**तेल्हारा (जि अकोला) येथील पोषण आहार पुरवठा धारकांकडून तांदळाचा काळाबाजार होत असल्याबाबत**

**(३८) १३६५८ (१८-०७-२०२०). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालेय पोषण आहारातील तांदुळाचा काळाबाजार करुन त्याचा ट्रक गोंदिया येथे पाठविल्या प्रकरणी तेल्हारा (जि अकोला) येथील धनश्री ट्रेडर्सच्या मालकाला अकोला पोलिसांनी दिनांक १० जून, २०२० रोजी वा त्यासुमारास पकडले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अकोला पोलिसांनी एमआयडीसी परिसरामध्ये ४०० क्विंटल तांदूळ घेवुन जात असलेल्या एका ट्रकला पकडले असता ट्रक चालकांनी धनश्री टेडर्सच्या मालकाचे नाव सांगितल्यामुळे त्यांना अटक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या पुर्वीसुद्धा होत असलेल्या तांदळाच्या काळाबाजारात धनश्री ट्रेंड्सच्या मालकाचा हात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शालेय पोषण आहारा संदर्भात अकोला जिल्ह्यातील विकास ट्रेडर्स कंपनीची या प्रकरणात चौकशी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१९-०५-२०२१) :** (१) व (२) एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन अकोला यांनी त्यांच्या हद्दीत दि.१.६.२०२० रोजी तांदळाने भरलेला ट्रक पकडला असून तांदळाचे ४१० कट्टे अंदाजे वजन १९ टन पकडले आहेत.
यामध्ये धनश्री ट्रेडर्सच्या मालकाला अटक करण्यात आली होती.
(३) व ( ४) एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन अकोला यांच्या प्रथम अहवालात (FIR) शालेय पोषण आहार योजनेच्या तांदळाचा उल्लेख नाही. तसेच सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षामध्ये अकोला जिल्ह्यातील तांदूळ व धान्याचा मालाचा पुरवठा आशुतोष ट्रेडर्स, अकोला यांना देण्यात आला आहे.
(५) प्रस्तुत प्रकरणी चौकशी व पुढील तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभाग पथक, अकोला यांचेमार्फत चौकशी सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

———————————

## मिरा-भाईंदर (जि.ठाणे) येथील शांती पार्क या रहिवाशी वसाहतीत खेळाच्या मैदानासाठी आरक्षित असलेल्या जागेवर अनधिकृत बांधकाम असल्याबाबत

**(३९) १३६७१ (२०-०९-२०२०). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर (जि.ठाणे) येथील शांती पार्क या रहिवाशी वसाहतीत खेळाच्या मैदानासाठी आरक्षित असलेल्या जागेवर अनधिकृत बांधकाम करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत शांती पार्क गृहनिर्माण सोसायटीने महानगरपालिकेकडे अनेकदा मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शांती पार्क मधील अनिधकृत बांधकाम निष्कासित करण्याची कारवाई महानगरपालिका करीत असताना सदर कारवाई थांबविण्यास स्थगित देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याची कारवाई थांबविण्याची व स्थगिती देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) असल्यास, सदर सोसायटीमधील खेळाच्या मैदानामधील अनधिकृत बांधकाम हटवून जागा मोकळी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०२-२०२१) :** (१) होय

(२) होय

(३) अपिलकर्ता जय श्री गोपाल मंडळ आणि गोवर्धन नाथ हवेली मंदिर यांनी शासनाकडे दाखल केलेल्या अपील अर्जावर प्रकरणात सुनावणीपर्यंत स्थगिती देण्यात आली आहे.

(४) सदर प्रकरणी जय श्री गोपाल मंडळ आणि गोवर्धन नाथ हवेली मंदिर यांनी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे कार्यवाहीविरुध्द मा.अपिलीय प्राधिकरण यांचेकडे दि.२३/०७/२०१९ रोजी अपिल दाखल केले असून त्यावर मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांनी "सुनावणीसाठी ठेवावे. तोपर्यंत निष्कासनाच्या कार्यवाहीला स्थगिती "असा शेरा नमूद केला आहे. अपिलकर्त्याने दाखल केलेल्या अपील अर्जाची व प्रकरणाची वस्तूस्थितीची तपासणी करुन त्यावर निर्णय घेणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रकरणात सुनावणीपर्यंत स्थगिती देण्यात आली आहे.

(५) अपिलकर्त्याच्या अपील अर्जावर सर्व संबंधितांचे म्हणणे ऐकून घेऊन त्यानंतर प्रकरणातील वस्तूस्थितीनुसार निर्णय घेण्याची शासनाची भूमिका असून त्यानुसार शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उदभवत नाही.

---

## अंबरनाथ (जि.ठाणे) येथील स्वस्त धान्याचा दुकानदाराकडून अपहार होत असल्याबाबत

**(४०) १३७१० (१५-०९-२०२०). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना काळात लॉकडाउनमुळे दारिद्र रेषेखालील कुटुंबांची उपासमार होऊ नये यासाठी शासनाने पाच किलो तांदूळ मोफत देण्याचा तसेच केशरी शिधावाटप पत्रिका धारकांना दोन रुपये

दराने तांदूळ आणि पाच रुपये दराने पाच किलो गहू देण्याचा निर्णय घेतला असतांना अंबरनाथ (जि.ठाणे) येथे अधिकाऱ्यांशी संगनमत करुन ८०० क्विंटल तांदूळ तसेच अन्य ७० हजार किलो धान्याचा अपहार केल्याच्या अनेक तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांनी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंबरनाथ येथील शिधावाटप - ४६ फ कार्यालयातील शिधावाटप अधिकारी, शिधावाटप निरीक्षक, उप नियंत्रक ४० फ व धान्य वितरित करणारा ठेकेदार यांच्या संगनमताने धान्याचा काळाबाजार होत असल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी लेखी मागणी देखील स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, धान्य वितरण करणाऱ्या ठेकेदारामार्फत शिधावाटप कार्यालयाला मंजूर कोटयानुसार धान्य पुरवठा होत नसल्याने अंबरनाथ शहरातील अनेक गरजू व गोरगरीब नागरिकांना टाळेबंदीच्या काळात शिधापत्रिकेवरील मोफतचे धान्य मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, अंबरनाथ रेशन कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी रेशनिंग दुकानदारांच्या संदर्भात शिधावाटप कार्यालयातील तक्रार नोंदवहीत नोंदवूनही संबधित रेशनिंग दुकानदारांवर अद्यापपर्यंत कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली, असल्यास, कार्यवाहीची सद्यस्थिती काय, आहे
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ (१९-०५-२०२१) :** (१) व (२) होय, तक्रारीत नमूद केलेल्या मुद्द्यांची चौकशी नियंत्रक शिधावाटप कार्यालयाकडून करण्यात आली. त्यामध्ये काही तथ्य आढळून आले नाही.
(३) हे खरे नाही. आत्मनिर्धार भारत योजने अंतर्गत स्थलांतरीत मजूर/विस्थापित मजूर व विना शिधापत्रिकाधारकांना मोफत प्रति व्यक्ती ५ किलो तांदूळ वितरीत करण्यात आले आहे.
(४) व (५) हे खरे नाही. तथापि, अधिकृत शिधावाटप दुकानांच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असून ४६-फ-३६ हे दुकान निलंबित करण्यात आले आहे.
तसेच टाळेबंदी लागू झाल्यापासून अंबरनाथ शिधावाटप क्षेत्रातील शिधापत्रिकाधारकांच्या प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने ३ दुकानांचे प्राधिकारपत्र रद्द करण्यात आले असून ४ दुकानांचे प्राधिकारपत्र निलंबित
करण्यात आले आहे. तसेच, तपासणीत आढळून आलेल्या दोषांच्या अनुषंगाने १८ दुकानांच्या प्राधिकारपत्रकाधारकांची खातेनिहाय चौकशीअंती अनामत रक्कम व अपहाराची रक्कम वसुलीचे आदेश शिधावाटप कार्यालयातर्फे पारित करण्यात आले आहेत.
(६) प्रश्नच उद्‌भवत नाही.

———————————

## स्वस्त धान्य दुकानदारांनी विविध मागण्यांसाठी केलेल्या राज्यव्यापी संपाबाबत

**(४१) १४४१६ (१५-०९-२०२०). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर जनतेच्या सर्वात जास्त संपर्कात येणारे स्वस्त धान्य दुकानदारांना विविध येणाऱ्या अडचणींच्या संदर्भातील मागण्यांबाबत दिनांक १ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास राज्यव्यापी संप करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त मागण्याच्याअनुषंगाने स्वस्त धान्य दुकानदारांना विमा संरक्षण, पीपीई किट वाटप, वैद्यकीय चाचणी, मोफत धान्य वाटपाचे कमिशन देणे इत्यादीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (०१-०२-२०२१) :** (१) राज्यातील नाशिक विभागात नंदुरबार, जळगांव, अहमदनगर, धुळे, अमरावती विभागात अमरावती, वाशिम, यवतमाळ, बुलढाणा, नागपूर विभागात भंडारा, चंद्रपूर, वर्धा, गोंदिया, पुणे विभागात पुणे (ग्रामीण), सोलापूर (ग्रामीण), कोल्हापूर, कोकण विभागात ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, औरंगाबाद विभागातील लातूर, जालना, औरंगाबाद व मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील रास्तभाव दुकानदार दि.१.६.२०२० रोजी राज्यव्यापी संपात सहभागी झालेले नाहीत.

उर्वरीत जिल्ह्यातील शिधावाटप दुकानदार दि. ०१.०६.२०२० रोजीच्या राज्यव्यापी संपात सहभागी झाले होते.
(२) कोरोनाच्या पार्श्वभूमीवर धान्य वाटप करताना रास्तभाव दुकानदारांना कोरोनाचा संसर्ग होण्याची शक्यता विचारात घेऊन संबधित जिल्ह्यातील कोरोनाकरीता असलेल्या वैद्यकीय यंत्रणेला निकषानुसार तपासणी करण्याबाबतच्या सूचना शासन पत्र दि. १२ मे, २०२० अन्वये सर्व जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त व नियंत्रक, शिधावाटप, मुंबई यांना देण्यात आल्या होत्या.

प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत मोफत वितरित करण्यात आलेल्या धान्याचे कमिशन रास्त भाव दुकानदारांना दि. १७.०७.२०२० च्या आदेशान्वये देण्यात आले आहे.

रास्त भाव दुकानदारांना विमा संरक्षण देण्याबाबतच्या प्रस्तावास सहमती प्राप्त झालेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

------------

**केंद्र शासनाकडून राज्य शासनाकडे प्राप्त झालेल्या निधीच्या विनियोगाबाबत**

**(४२) १४४२२ (११-०९-२०२०). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोना काळात केंद्र शासनाकडून प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या आजमितीस किती निधी प्राप्त झाला आहे,
(२) तसेच, पी पी ई किट्स, डिस्पोजेबल ग्लोव्हज अशा वस्तुरूपात किती मदत प्राप्त झाली आहे,
(३) असल्यास,उपरोक्त प्राप्त निधी व वस्तूंचे वितरण किती प्रमाणात झाले असून अद्याप किती वितरण शिल्लक आहे ?

**श्री. अजित पवार (०१-०७-२०२१) :** (१), (२), (३) कोरोना संकटकाळात (एप्रिल २०२० ते मार्च २०२१ पर्यंत) केंद्रीय करातील हिश्श्यापोटी रू.३६,४७९ कोटी व केंद्रीय सहायक अनुदानापोटी रू.५२,६७६ कोटी ( यामध्ये वस्तु व सेवा कर नुकसान भरपाई, १५ व्या वित्त आयोगानुसार निधी, तसेच राज्य आपत्ती प्रतिसाद निधी व राष्ट्र आपत्ती प्रतिसाद निधीच्या रकमा अंतर्भूत आहेत ) इतका निधी प्राप्त झाला आहे.

कोरोनासाठी केंद्र शासनाने विहित केलेल्या उपाययोजनांसाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून रू.८६०९२.६१ लाख वितरीत केला आहे. केंद्र शासनाकडून कोविड-१९ प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना अंतर्गत रू.१०६.४३ कोटी एवढा निधी प्राप्त झाला आहे. प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना व आत्मनिर्भर योजनांतर्गत प्राप्त झालेल्या अन्य धान्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना मे टन

| अ.क्र | अन्नधान्य व कालावधी | प्राप्त | एकूण वितरित |
|---|---|---|---|
| १. | प्रगकअयो -१ तांदूळ<br>एप्रिल ते जून २० | १०५०२४६ | ९५२६३० |
| २. | प्रगकअयो -१ गहू व तांदूळ<br>जुलै ते नोव्हें २० | १७५०३९६ | १५४६०९९ |
| ३. | प्रगकअयो - डाळ<br>एप्रिल ते नोव्हेंबर २० | १३१.८४ | १०३.७३ |

आत्मनिर्भर भारत योजना

| अ.क्र | अन्नधान्य व कालावधी | प्राप्त | एकूण वितरित |
|---|---|---|---|
| १. | तांदूळ - मे ते जून २० | ३५.९४ | १७.३३ |
| २. | चणे - मे ते जून २० | १७६६ | ११४१ |

कोरोना संकटकाळात केंद्र शासनाकडून माहे फेब्रुवारी, २०२१ अखेरपर्यंत प्राप्त झालेल्या पी.पी.ई. किट्स, डिस्पोझेबल ग्लोव्हज, व्हेंटीलेटर्स व इतर वस्तूंचा तपशील व सदर वस्तुंचे मार्च,२०२१ पर्यंत करण्यात आलेले वितरण याबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | वस्तु | एकूण प्राप्त वस्तू | एकूण वितरित वस्तू | वितरण बाकी |
|---|---|---|---|---|
| १. | एन-९५ मास्क | ३०८५८५० | २९२३८०० | १६२०५० |
| २. | ट्रिपल लेअर मास्क | ९९००००० | ९८८७००० | १३००० |
| ३. | पी.पी.ई. किट | ० | ० | ० |
| ४. | डिस्पोझेबल गाऊन | १४३१७२० | १३५३७२० | ७८००० |
| ५. | टॅब-हायड्रोक्लोरीन | ९७२०००० | ९७१९००० | १००० |
| ६. | टॅब-अझिथ्रोमायसीन | ३२९२०० | ३२९२०० | ० |
| ७. | सार्स-कोवी-२ अँटीबॉडी टेस्ट | ७८००० | ९० | ७७९१० |
| ८. | वि.टी.एम किट | ९०० | ९०० | ० |
| ९. | गॉगल्स | १३०४६५५ | १२७०१५५ | ३४५०० |
| १०. | ग्लोव्हज-६ | १७५०० | १७५०० | ० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११. | ग्लोव्ह्ज-६.५ | ४२८४६० | ३३८९६० | ८९५०० |
| १२. | ग्लोव्ह्ज-७ | ३८५२०० | २९१७०० | ९३५०० |
| १३. | ग्लोव्ह्ज-७.५ | १०००० | १०००० | ० |
| १४. | शु-कव्हर | १५००० | १५००० | ० |
| १५. | व्हेंटीलेटर | ४३८३ | ४३८३ | ० |
| १६. | ऑक्सिजन सिलेंडर-बी | १२२३८ | १२२३८ | ० |
| १७. | ऑक्सिजन सिलेंडर-डी | ९८२३ | ९८२३ | ० |

तसेच कोरोना संकट काळात केंद्र शासनाकडून कोविड-१९ पी.आय.पी. या सदराखाली दि.१०.०३.२०२१ पर्यंत रू.७१६.५० कोटी इतका निधी प्राप्त झाला होता. उपलब्ध करून देण्यात आलेल्या एकूण रकमेतून दि.१०.०३.२०२१ पर्यंत जिल्हा स्तरावर रू.६०७.११ कोटी इतक्या निधीचे वितरण करण्यात आलेले असून, त्यापैकी रू.४४५.१५ कोटी इतका खर्च झाला असून रू.२७१.३७ कोटी इतका निधी दि.१०.०३.२०२१ अखेर उपलब्ध होता.

———————————

**अंधेरी (पूर्व) येथील महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाच्या जागेवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील संबंध नसलेल्या व्यक्तींना विक्री केल्याबाबत.**

**(४३) १९८०५ (२०-११-२०२०). श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (पूर्व) येथील महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाच्या जागेवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील बालवाड्या, सोसायटी ऑफिस, समाजकल्याण केंद्र व पुनर्वसनाकरिता असलेल्या सदनिका अशा एकूण ९९ सदनिका विकासक व त्यांच्या कर्मचाऱ्यांनी योजनेशी संबंध नसलेल्या व्यक्तींना परस्पर विक्री केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरण महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाच्या अधिकारांच्या लक्षात आणून दिल्यानंतर दिनांक २९ ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्यासुमारास एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे अंधेरी (पूर्व) येथे तक्रार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तक्रार करून १ वर्षाचा कालावधी उलटल्यानंतरही महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी अनधिकृत वास्तव्य करणाऱ्या व्यक्तींवर महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ कलम ३ (ई) अन्वये निष्कासनाची कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त प्रकरणाकडे दुर्लक्ष करून विकासकास योजनेत नवीन बांधकाम करण्यास परवानगी देणाऱ्या व सदर ९९ सदनिकेमध्ये अनधिकृत वास्तव्य करणाऱ्यांवर निष्कासनाची कारवाई न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०३-०३-२०२१) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

सदर प्रकरणी महामंडळाने दि. २९/०८/२०१९ रोजी वरीष्ठ पोलीस निरीक्षक एमआयडीसी पोलीस ठाणे अंधेरी (पूर्व) यांचेशी पत्रव्यवहार करुन, विकासकाने दि. २८/०५/२०१९ रोजीच्या

पत्रामधील नमूद अनधिकृत घुसखोरांविरुध्द कारवाई करणेबाबत, विकासकास सहकार्य करावे याबाबत विनंती केली होती. त्याअनुषंगाने महामंडळामार्फत दि. १३/०२/२०२० रोजी घुसखोरांविरुध्द

व अनियमितपणे ताबा घेतलेल्या अशा एकूण ९९ अज्ञात व्यक्तींविरोधात एमआयडीसी अंधेरी (पूर्व) पोलीस स्टेशन येथे FIR दाखल केलेला आहे.

तसेच, करारनाम्यातील मुख्य तरतुदीनुसार विकासकाने परस्पर वाटप केलेल्या सदनिकांच्या गैरकारभारामुळे व वेळोवेळी केलेल्या अनियमिततेमुळे पुनर्वसन घटकांमधून

(Rehabilitation Components) १६,१२२.५१ चौ.मी. इतके क्षेत्रफळ विकासकाच्या विक्री करावयाच्या घटकामध्ये (Sale Component) वळते करण्यात आले आहे.

(४) सदर प्रकरणावर कोणत्याही प्रकारे दुर्लक्ष करण्यात आलेले नाही.

म.औ.वि. महामंडळामार्फत दि. १३/०२/२०२० रोजी FIR दाखल केल्यानंतरही दि. ११/११/२०२० रोजीच्या पत्रान्वये सदर प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली याबाबत वरिष्ठ पोलीस निरिक्षक, एमआयडीसी पोलीस ठाणे यांना विचारणा करण्यात आली आहे.

दरम्यानच्या काळात विकासकाने या योजनेत केलेल्या विविध अनियमिततेबाबत व झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील विविध अडचणींवर चर्चा करुन

समस्या सोडविण्याकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी, सह मुख्य कार्यकारी अधिकारी (मा./तं.) व महामंडळाचे अधिकारी व योजनेतील संबंधित अधिकारी तसेच योजनेचे विकासक तसेच संचालक, मे. हबटाऊन लि.

यांच्यासोबत दि.०९/१०/२०२० रोजी Video Conference द्वारे बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीत ठरल्याप्रमाणे विहीत मुदतीत योजनेतील काम पुर्ण करण्यासाठी कालबध्द मुदत निश्चित

करण्यात आली होती. तथापि, बैठकीत ठरल्याप्रमाणे कोणतीही कामे विहीत मुदतीत पुर्ण करण्याचा विकासकाचा दृष्टीकोन दिसत नाही. याउलट दि. ०५/११/२०२० रोजीच्या पत्रान्वये विकासकाने यापुर्वीच दिलेली

तथ्यहीन कारणे महामंडळास पुन:श्च कळविली आहेत. त्याअनुषंगाने विकासकाची योजना पुर्ण करण्याची मानसिकता दिसत नसल्यामुळे विकासकावर गुन्हा दाखल करणे आवश्यक आहे. याबाबत अंतरिम कार्यपूर्ती

अहवालाद्वारे महामंडळामार्फत विकासकावर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

___________

### राज्यातील विशेष सहाय्य योजनेतील वृद्ध लाभार्थ्यांना घरपोच अर्थसहाय्य वाटप करण्याबाबत

**(४४) २०२७२ (१५-०१-२०२१). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी अपंग निवृत्तीवेतन या योजनेतील प्रत्येक गावातील वयोवृध्द लाभार्थ्यांना सेतू सुविधा केंद्र तसेच सी.एस.सी.सेंटर किंवा मिनी बँक द्वारे त्यांच्या गावातच घरपोच अर्थसहाय्य वितरित करण्याबाबत औसा विधानसभा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक २३ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर निवेदनाच्या अनुषंगाने राज्यातील विशेष सहाय्य योजनेतील वृद्ध लाभार्थ्यांना गावातच घरपोच अर्थसहाय्य वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२६-०२-२०२१) :** (१)हे खरे आहे.

(२) विभागाच्या दिनांक २० ऑगस्ट, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांना त्यांच्या जवळच्या बँक / पोस्ट बचत खाते उघडण्याचे मुभा आहे. त्यानुसार सदर योजनेतील लाभार्थ्यांने उघडलेल्या बँक / पोस्ट बचत खात्यात अर्थसहाय्याचे वितरण केले जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

\-----------

### मौजे आसगाव व कालकुंद्री (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथे ताम्रपणी नदीवर पूल बांधणेबाबत

**(४५) २०२७६ (२८-१२-२०२०). श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील ताम्रपणी नदीच्या तिरावर वसलेले आसगाव या गावाकडे ये-जा करणेसाठी तसेच कालकुंद्री पासून कोवाड येथे ये-जा करणेसाठी ताम्रपणी नदीवर पूल नसल्याने नागरिकांना वळसा घालून प्रवास करावा लागतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आसगाव येथील नागरिकांना बाजार हाट करण्याकरिता व उपचारासाठी आरोग्य उपकेंद्र नागणवाडी येथे ये-जा करावी लागत असल्याने सदर ठिकाणी पूलाची अत्यंत आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कालकुंद्री येथील नागरिकांना कोवाड येथे बाजारासाठी, आरोग्य व पोलिस स्टेशनसाठी नेहमी ये-जा करावी लागत असल्याने सदरहु ठिकाणी पूल झाल्यास नागरिकांची होणारी गैरसोय दूर होईल, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून ताम्रपणी नदीवर असलेले आसगाव ते नागणवाडी या दरम्यान तसेच कालकुंद्री ह्या ठिकाणी पूल होणेसाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (२६-०३-२०२१) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) अ) राज्यमार्ग क्र.१८० ते आसगाव रस्ता हा ग्रामीण मार्ग क्र.४० असून सदर ठिकाणी पाणंद स्वरुपाचा रस्ता आहे. सदर रस्त्याची लांबी २.०० कि.मी.आहे. सदर रस्त्याच्या कि.मी.१/५०० मध्ये ताम्रपणी नदी असून पात्राची रुंदी १०० मी.आहे. त्यामुळे १०० मी.लांबीचा पूल बांधण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी रस्ता व पूल बांधावयाचा झाल्यास अंदाजे रु.६.०० कोटी खर्च अपेक्षित आहे. यामुळे ४.०० कि.मी.अंतर कमी होणार आहे.

ब) कोवाड कालकुंद्री रस्ता हा ग्रामीण मार्ग क्र.२५ असून पाणंद स्वरुपाचा रस्ता आहे. सदर रस्त्याची लांबी २.०० कि.मी.आहे. सदर रस्त्याच्या कि.मी.०/३०० मध्ये ताम्रपणी नदी असून पात्राची रुंदी २०० मी.आहे. त्यामुळे २०० मी.लांबीचा पूल बांधण्याची आवश्यकता आहे.या ठिकाणी रस्ता व पूल बांधावयाचा झाल्यास अंदाजे रु.१२.०० कोटी खर्च अपेक्षित आहे. यामुळे २.५० कि.मी.अंतर कमी होणार आहे.

निधीच्या उपलब्धतेनुसार रस्ते व पूलाचे काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

सध्या नागणवाडी व कोवाड येथे ये-जा करण्यासाठी पर्यायी रस्ता उपलब्ध आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विक्रमगड (जि. पालघर) तालुक्यातील देहर्जे प्रकल्प बाधित शेतकरी व बिगर शेतकरी बांधवांचे पुनर्वसनासह इतर मागण्यांबाबत

**(४६) २०३१५ (१९-०३-२०२१). श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि. पालघर) तालुक्यातील देहर्जे मध्यम प्रकल्पाचा साठा प्रकल्पात रुपांतर करून धरणाचा उजवा व डावा कालवा रद्द न करणे, प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या पूर्ण होईपर्यंत प्रत्यक्ष प्रकल्पाचे काम सुरु करू न करणे, प्रकल्पग्रस्तांचे भूसंपादन व इतर मालमत्तेचे योग्य मुल्यांकन करूनच पुनर्वसन करणे, कालव्याची लांबी वाढविणे आदी मागण्या देहर्जे प्रकल्पबाधित शेतकरी, बिगर शेतकरी व देहर्जे मध्यम प्रकल्प संघर्ष समिती यांनी मा.मुख्यमंत्री, मा.जलसंपदा मंत्री, मा.पुनर्वसन मंत्री, प्रधान सचिव जलसंपदा विभाग, जिल्हाधिकारी पालघर यांच्याकडे केलेल्या असतानाही अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु मागण्याबाबत योग्य तो निर्णय घेऊन प्रकल्पाचे काम तात्काळ सुरू करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०२-०७-२०२१) :** (१) अंशतः खरे आहे.

मंजूर मुळ प्रकल्प अहवालानुसार देहरजी मध्यम प्रकल्प हा सिंचन प्रकल्प प्रस्तावित होता. या प्रकल्पाव्दारे विक्रमगड व पालघर तालुक्यातील एकूण ४२३० हे. सिंचन क्षेत्र प्रस्तावित होते. तथापि शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१४ / प्र.क्र. ६८/ १४/ मध्यम प्रकल्प, दि. ०४.०३.२०१४ अन्वये सदर प्रकल्पातून वसई-विरार शहर महानगर पालिकेस पिण्यासाठी पाणी आरक्षित करण्यास मान्यता मिळाली आहे.

देहरजी मध्यम प्रकल्पाबाबत संघर्ष समितीचे दि.१०.०९.२०२० रोजीचे पुनर्वसन निवेदन विभागीय कार्यालयास प्राप्त झाले असून, त्यानुसार संघर्ष समितीचे पदाधिकारी व सदस्य यांचे सोबत संयुक्त बैठक विभागीय कार्यालयात दि.१०.०९.२०२० रोजी व जिल्हाधिकारी पुनर्वसन, पालघर यांचे कार्यालयात दि.२५.०९.२०२० रोजी घेण्यात आलेली असून, त्यांचे मागण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आलेली आहे. प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथे दि. १४.१२.२०२० रोजी अप्पर जिल्हाधिकारी, पालघर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आलेली होती. सदर बैठकीतील सूचनांप्रमाणे जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पालघर यांच्या मार्फत पुनर्वसना-करिता आवश्यक जमीन उपलब्ध होणे करिता जाहीर नोटीस वृत्त पत्रात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे व त्या अनुषंगाने पर्यायी जमिनीचा शोध सुरु आहे.

(२) स्थानिक लोकांना पिण्याचे व जनावरांना लागणाऱ्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी धरणाच्या खालील बाजूस ६ को.प.बंधा-यांचा प्रस्तावित सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीमध्ये प्रकल्पाचे काम सुरु करण्यात आलेले आहे. सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावाची तांत्रिक तपासणी राज्यतांत्रिक सल्लागार समिती मार्फत अंतिम टप्प्यात आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------

**येऊर (जि.ठाणे,) येथील डोंगरभागात शेती करणाऱ्या आदिवासीची शेत पिके वनधिका-यानी उध्वस्त केल्याबाबत**

**(४७) २०३३० (१५-०१-२०२१). श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येऊर (जि.ठाणे) येथील डोंगरभागात पारंपारीक पध्दतीने शेती करणाऱ्या आदिवासींची कापणीला आलेला भात, तूर व नाचणी ही पिके त्यांना न कळविता वनाधिकाऱ्यांनी उध्वस्त केली असल्याचे दिनांक २४ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लॉकडाऊनच्या काळात सदर परिसरात अनेक अनधिकृत बांधकामे सुरु झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आदिवासीच्या शेतपिकाचे नुकसान करण्याऱ्या वनधिकाऱ्यांवर तसेच अनधिकृत बांधकामाला आळा घालण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (१२-०३-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) वनक्षेत्रावरील शेतीसाठी केलेल्या अनधिकृत अतिक्रमणांवर वनगुन्हे नोंद करुन प्रचलित नियमांच्या तरतूदीनुसार अतिक्रमणे निष्कासीत करण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------

## मुंबई शहरातील अनुदानित प्राथमिक शाळांमधून निवृत्त झालेले शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी निवृत्तीवेतनापासून वंचित असल्याबाबत

**(४८) २०३३४ (२५-१२-२०२०). श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा. मुंबई उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाने आदेश देऊनही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धोरणामुळे मुंबई शहरातील अनुदानित प्राथमिक शाळांमधून गत १० वर्षात निवृत्त झालेले १०० शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी हे निवृत्तीवेतनापासून वंचित राहिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शिक्षकांना व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पूर्ण पेन्शन नाकारताना मांडलेला मुद्दा न्यायालयांनी वारंवार फेटाळला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित शिक्षक वा शिक्षकेत्तर कर्मचारी ज्या शाळेतून निवृत्त झाले ती शाळा त्यांच्या संपूर्ण सेवाकाळात १०० टक्के अनुदानित नसली तरीही निवृत्तीच्या दिवशी शाळा १०० टक्के अनुदानित असेल तर महानगरपालिकेने शिक्षक वा शिक्षकेत्तर कर्मचारी यांना पूर्ण निवृत्तीवेतन देण्याबाबत निकाल न्यायालयाने दिला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त मुद्द्यावर महानगरपालिकेच्या विरोधात पहिला निकाल मा. उच्च न्यायालयाने श्रीमती अनुराधा जयंत गंगाखेडकर यांच्या याचिकेवर दिनांक २६ जुलै, २०१२ रोजी वा त्या सुमारास दिला व तद्नंतर या निकालाविरुध्द महानगरपालिकेने केलेली फेरविचार याचिका मा. उच्च न्यायालयाने व नंतर केलेली अपीलही मा. सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली, तरीही महानगरपालिकेने श्रीमती गंगाखेडकर यांच्या निवृत्तीवेतनाचा हिशेब करताना शाळेला पूर्ण अनुदान मिळत नव्हते ती वर्षे त्याच्या सेवाकाळापासून वगळून अर्धवट निवृत्ती वेतन लागू केल्यामुळे श्रीमती गंगाखेडकर यांनी कंटेम्प्ट याचिका दाखल केली असता, मा. न्यायालयाने पुन्हा एकदा पूर्ण निवृत्तीवेतन देण्याचा आदेश देऊन मा.न्यायालयाच्या आधीच्या आदेशानंतरही अर्धवट निवृत्तीवेतन ठरविणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा आदेशही दिला होता, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, महानगरपालिकेने याव्यतिरिक्त आणखी सुमारे ९८ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पूर्ण निवृत्तीवेतन नाकारली आहेत, तसेच अनेकांची निवृत्तीवेतनाची प्रकरणे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार संबंधित सर्व निवृत्त झालेले कर्मचारी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना न्यायालयाचे आदेशानुसार पूर्ण सेवानिवृत्ती वेतन विनाविलंब अदा करण्याबाबत तसेच या प्रकरणी दोषी असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०३-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) याचिका क्रमांक ४१५/२०१२ व १९१/२०१३ मधील मा. उच्च न्यायालयाचे आदेश बृहन्मुंबई महानगरपालिकेविरुध्द आहेत.

तथापि याच धर्तीवरील याचिका क्रमांक ३०५०/२०१५ मध्ये मा. उच्च न्यायालयाने "fairly arguable case is made out" असे निरीक्षण नोंदविले असून, सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) व (४) हे खरे आहे.
(५) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक ३१.१०.१९९७ रोजीच्या निवृत्तीवेतन परिपत्रकातील तरतुदीनुसार निवृत्तीवेतन अनुज्ञेय असणाऱ्या सुमारे ३४६५ खाजगी प्राथमिक अनुदानित शाळांमधील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून नियमितपणे निवृत्तीवेतन व निवृत्तीवेतनादी लाभ देण्यात येत आहेत.

तथापि, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी निवृत्तीवेतनास पात्र ठरविण्यासाठी शाळेला १०० टक्के अनुदान मिळाल्यापासूनची त्यांची अर्हकारी सेवा किमान १० वर्षे असणे आवश्यक आहे.

सदर अटीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील मान्यताप्राप्त अनुदानित प्राथमिक शाळांमधून मागील १० वर्षांत निवृत्त झालेले शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी हे निवृत्तीवेतनास पात्र नसल्यामुळे ते निवृत्तीवेतनापासून वंचित आहेत ही वस्तुस्थिती आहे.
(६) व (७) श्रीमती अनुराधा गंगाखेडकर यांनी दाखल केलेल्या याचिका क्रमांक ४१५/२०१२ व त्या धर्तीवर श्रीमती वैशाली जाधव व इतर यांनी दाखल केलेल्या याचिका क्रमांक १९१/२०१३ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

तथापि, श्रीमती अनुराधा गंगाखेडकर यांनी दाखल केलेल्या याचिकेतील आदेशाच्या धर्तीवर श्रीमती सुषमा पवार व श्रीमती जयवंती अनंत धनू यांनी मा. उच्च न्यायालयात अनुक्रमे याचिका क्रमांक ४२४/२०१४ व ३०५०/२०१५ दाखल केल्या आहेत.

त्यापैकी याचिका क्रमांक ४२४/२०१४ मधील मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाविरुध्द बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष याचिका क्रमांक ३२९७३ व ३२९७५/२०१८ दाखल करण्यात आली असून, सदर याचिका मा. सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहेत.

तसेच, याचिका क्रमांक ३०५०/२०१५ याचिकेच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मांडण्यात आलेले मुद्दे विचारात घेऊन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विरोधात कोणतेही आदेश पारित केलेले नाहीत. सदर याचिका न्यायप्रविष्ठ आहे.

---

## नवी मुंबईत सिडकोची सहा हजार घरे विक्रीविना असल्याबाबत

**(४९) २०३३५ (०७-०१-२०२१). श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिडकोने दोन वर्षांपासून नवी मुंबईतील जवळपास २६ हजार घरांची सोडत काढली असून यातील सुमारे ०६ हजार घरे विक्रीविना शिल्लक राहिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान १४ हजार ७३८ घरे तर माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान ९ हजार ४६६ घरांची सोडत सिडकोकडून काढण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यमान बाजार भावाचा अभ्यास करून सिडकोचा वित्त विभाग घरे तसेच गाळ्यांची किंमती ठरवित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून

आले व त्यानुसार महामुंबई क्षेत्रात विक्रीविना शिल्लक असलेली घरे विनाविलंब विक्री होण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०५-२०२१) :** (१) व (२) होय, हे अशंत: खरे आहे,
सद्यस्थितीत, ४४५६ घरे विक्रीविना शिल्लक आहेत. सिडकोने गेल्या तीन वर्षामध्ये एकूण २३३३७ सदनिकांच्या विक्रीसाठी टप्प्याटप्प्याने एकूण ४ सोडतींद्वारे घरांची सोडत काढली आहे.
(३) सिडकोच्या धोरणानुसार अर्थशास्त्र विभागामार्फत किंमत ठरविण्यात येते.
(४) विक्रीसाठी शिल्लक असलेल्या ४४५६ सदनिकांची विक्री करण्याच्या अनुषंगाने सिडकोकडून कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

———————————

**सामाजिक न्याय विभागांतर्गत लोककल्याणाचा निधी इतरत्र वळवल्याबाबत**

**(५०) २०३३८ (१५-०१-२०२१). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), ॲड.शहाजीबापू पाटील (सांगोले), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या सन २०१४-१५ ते २०१८-१९ या कालावधीत अर्थसंकल्पात अनुसूचित जातीच्या विकासासाठी तरतूद केलेल्या ३६ हजार ४६६ कोटी पैकी २२ हजार २६६ कोटी रुपये खर्च झाले असून १४ हजार १९८ कोटी रुपये खर्चच केलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१९-२० मध्ये १२ हजार २०४ कोटी रुपयापैकी केवळ ४४८३ कोटी खर्च झाले तर ४७२५ कोटी रुपये खर्च झाले नाहीत, चालू वर्षात सन २०२०-२१ च्या सबप्लॅन योजनेचे बजेट ०१ लाख १५ हजार कोटीचे आहे, मात्र अनुसूचित जातीसाठी लोकसंख्येनुसार १३ हजार ५७० कोटी रुपये हवे होते, परंतु, तरतूद मात्र ०९ हजार ६६८ कोटी करून ०३ हजार ९०२ कोटी रुपये नाकारण्यात आले, तसेच, यावर्षी कोरोना मुळे ६७ टक्के निधी कपातीचा निर्णय घेण्यात आल्यामुळे सामाजिक न्याय विभागाच्या अनेक योजना राबविण्यास अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील ०५ वर्षात राज्याच्या अर्थसंकल्पात अनुसूचित जातींच्या विकासासाठी तरतूद केलेल्या निधीपैकी तब्बल १४ हजार १९८ कोटी रुपये अखर्चित राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) सामाजिक न्याय विभागांतर्गत लोककल्याणाचा निधी इतरत्र वळवल्याने अनुसूचित जाती व नव बौध्द जनतेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्यामुळे अनुसूचित जाती जमातीचा निधी इतरत्र वळवू नये किंवा अखर्चित निधी ठेऊ नये यासाठी कायदा पारित करण्यासंदर्भात नॅशनल दलित मुव्हमेंट ऑफ जस्टीस चे राज्य सहसचिव पी. एस. खंदारे यांनी मा. सामाजिक न्याय मंत्री यांचेकडे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२१-०६-२०२१) :** (१) मागील ५ वर्षात (सन २०१४-१५ ते २०१८-१९) अनुसूचित जाती उपयोजनेतंर्गत रु.३६४१९.५१ कोटी इतका निधी मंजूर झाला होता. त्यापैकी रु.२४९९१.४१ कोटी इतका निधी खर्च झालेला आहे.

(२) (३), (४), (५) व (६) सन २०१९-२० मध्ये ९२०८ कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत असून बीम्स प्रणालीनुसार रु.६७९७ कोटी इतका निधी खर्च झालेला आहे. सन २०२०-२१ मध्ये रु.९६८८ कोटी इतका नियतव्यय अर्थसंकल्पीत असून वित्त विभागाच्या दि.४.५.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यक्रमांतर्गत योजनांसाठी २०२०-२०२१ अर्थसंकल्पीय निधीच्या फक्त ३३ टक्के निधी उपलब्ध होईल या सूत्राच्या अधीन राहून विभागाने नियोजन करावे असे निदेश दिले आहेत. सामाजिक न्याय विभागांतर्गत निधी इतरत्र वळविण्यात येत नाही. या विभागाकडून अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील वैयक्तिक लाभाच्या विविध योजना राबविण्यात येतात. तसेच इतर विभागांच्या वैयक्तिक लाभार्थ्यांच्या योजनेला अनुसूचित जाती व नवबौध्द लाभार्थ्यांसाठी अनुसूचित जाती घटक उपयोजनेतंर्गत निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. मात्र निधी खर्च करताना पात्र लाभार्थ्यांनाच दिला जाणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक विहित प्रक्रिया राबविताना निधी खर्च करण्यास मर्यादा येतात. नॅशनल दलित मुव्हमेंट ऑफ जस्टीस चे राज्य सह सचिव पी. एस. खंदारे यांचे दि.२०.१.२०२० रोजीचे निवेदन प्राप्त झाले असून आंध्रप्रदेश, कर्नाटक व ओरिसा या राज्याने सन २०१३ पासून अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी उपयोजनेचा कायदा केलेला आहे. सदरहू कायद्यांचा अभ्यास करुन महाराष्ट्र राज्यामध्ये अनुसूचित जाती उपयोजना कायदा करण्यासाठीच्या प्रस्तावावर वित्त विभाग, नियोजन विभाग व विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

———————————

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.